# संपादकीय

## ग्रंथव्यवहाराचे उत्साहवर्धक वातावरण

नवसहस्रकातील पहिले वर्ष मराठी साहित्य-प्रकाशन क्षेत्राच्या दृष्टीने गजबजलेले, उत्साहवर्धक आणि आव्हानात्मक ठरले असे म्हणायला हरकत नाही. प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांची संख्या यंदाही दरवर्षीच्या तुलनेने जास्त आहे असे प्राथमिक अंदाजावरूनही लक्षात येते. डी. टी. पी. च्या वाढत्या सोयीमुळे लेखक-कवींनी स्वत:च स्वत:चे पुस्तक काढण्याची प्रवृत्ती आता जोम धरीत आहे; त्यामुळे अशा नवख्या लेखकांची पुस्तके किती निघाली याचा नीट अंदाजही येत नाही. कारण त्यांची वितरणयंत्रणा नसल्याने ती पुस्तके निघाल्यावरही सगळीकडच्या विक्रेत्यांकडे पोचतातच असे नाही. सेल्फ पब्लिशिंगमुळे एकूण व्यवहारात भर पडली तरी व्यावसायिक प्रकाशन संस्थांचे महत्त्व हे अबाधितच राहते. निर्मितिमूल्ये, पुस्तकाची निवड करण्यामागची दृष्टी, त्यांची व्यापक व विश्वासार्ह वितरणयंत्रणा, त्यांची सातत्याने होणारी प्रसिद्धी व जाहिरात, सगळीकडे सहज उपलब्धता व एकूणच पुस्तकाचा कसदारपणा यामुळे अशा प्रस्थापित प्रकाशकांची उलाढाल मोठ्या प्रमाणावर होते. हजारावर ज्यांची पुस्तके निघाली आहेत अशा ढवळे, कॉंटिनेंटल, पॉप्युलर, देशमुख, मॅजेस्टिक, मेहता, श्रीविद्या, दिलीपराज, वगैरे प्रकाशन संस्था आणि तीस-चाळीस व अधिक वर्षे सातत्याने प्रकाशन व्यवसायात असणाऱ्या मौज, परचुरे, साकेत, सुगावा, रविराज, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, राजहंस, साधना, लोकवाङ्मयगृह वगैरे संस्था यांचा दबदबा हा राहणारच. गेल्या २५ वर्षात निघालेल्या अनेक प्रकाशनसंस्थाही विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांद्वारे ग्रंथव्यवहारात आपले स्थान निर्माण करण्यात यशस्वी ठरल्या आहेत. पुणे-मुंबई या परिसरात ग्रंथ-व्यवहाराचे केंद्र असले तरी आता नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर, नाशिक, अमरावती, नांदेड, परभणी वगैरे ठिकाणीही ग्रंथप्रकाशनाचा वेग वाढलेला दिसतो. कथा-कादंबऱ्यांचे प्रमाण आता कमी होऊन उपयोजित, उपयुक्त धार्मिक, ज्ञान-विज्ञान, तंत्रमंत्र, व्यक्तिमत्त्व विकास पाकशास्त्र-ज्योतिष-कलासाधना-वास्तुशास्त्र वगैरे विषयांची पुस्तकेही अधिक निघत आहेत आणि चांगला धंदा करीत आहेत. मराठी ग्रंथ-व्यवहारात आता सर्वच दृष्टींनी व्यापकता येत चालली आहे. नवे विक्रेते निर्माण होत आहेत. ग्रंथप्रदर्शने भरवणारे धाडसी तरुणही पुढे येत आहेत.

गेल्या वर्षात विशेष जाणवलेल्या बाबी म्हणजे अनुवादित साहित्याला मिळालेले प्राधान्य आणि विविध संस्थांनी राबवलेले महत्त्वाकांक्षी असे प्रकल्प.

एक काळ असा होता की मराठीत अनुवादित पुस्तके फारशी खपत नसत. त्यामुळे प्रकाशक ती काढण्यास उत्सुक नसत. परंतु मेहता पब्लिशिंग हाऊसने टी बुक क्लब ही कल्पना कल्पकतेने राबवून वाचकांना अनुवादित पुस्तकांची चटक लावली. बहुसंख्य मराठी वाचकांना मूळ इंग्रजीतील पुस्तके वाचणे, कळणे अवघड जाते. इंग्रजी वाचनाचा एक तर वेग कमी पडतो आणि अनेक अपरिचित शब्द आल्याने वारंवार अडखळायला होते. त्यामुळे पुस्तक वाचायला घेतले तरी शेवटपर्यंत वाचण्याचा स्टॅमिना टिकतोच असे नाही. मराठीत मात्र ही पुस्तके सहज वाचता येतात, उत्तम कळतात. त्यातील उत्कंठापूर्ण कथानकाशी आणि नायक-नायिकांशी



वाचक सहजपणे समरस होऊन जातो. ग्रामीण भागातून हजारो तरुण दरवर्षी पदवीधर होतात, चांगल्या नोकऱ्या मिळवतात; त्यांना स्पर्धात्मक वातावरणामुळे जगाबद्दल, साहित्याबद्दल असीम कुतूहल असते. त्यांना ही अनुवादित बेस्ट सेलर पुस्तके म्हणजे नव्या अद्भुतरम्य जगाचे प्रवेशद्वारच वाटते. त्यामुळे अशी अनुवादित पुस्तके त्यांना प्रिय वाटतात. त्यावर त्यांच्या उड्या पडतात. शहरी मध्यमवर्गीय वाचकांनाही मूळ इंग्रजीतून पुस्तक वाचण्याऐवजी अनुवाद वाचणे अधिक सोयीचे वाटते. कारण मराठीतून कथानकाची गुंतागुंत समजून घेताना फारसा ताण पडत नाही. मेहतांच्या टी बुक क्लबच्या यशामुळे इतरही अनेक नवे-जुने प्रकाशक अनुवादित पुस्तकांच्या प्रकाशनावर भर देऊ लागले आहेत. इंग्लंड-अमेरिकेतील जुनीच नव्हे तर नवी गाजणारी पुस्तकेही आता अल्प काळातच मराठीत येऊ लागली आहेत. शेजारी देशातील व भारतीय लेखकांचीही गाजलेली पुस्तके याला अपवाद नाहीत. अरुण शौरी, किरण बेदी, तस्लिमा नासरिन, विक्रम सेठ, खुशवंत सिंह, विक्रमचंद्रा, शोभा डे, प्रतिमा बेदी, आर. के लक्ष्मण, अरुंधती रॉय यांची पुस्तके आता मराठीतून वाचण्यासाठी फार काळ कळ काढावी लागत नाही. मायकेल क्रिशटन, हॅरॉल्ड रॉबिन्स, मारिओ पुझो, एरिक सेगल, जेम्स हॅडले चेझ, रॉबिन कुक, फ्रेडरिक फोरसिथ, हॉल केन, रिचर्ड प्रेस्टन, जेफ्रे आर्चर, आयर्विंग वॅलेस, ॲलिस्टर मॅक्लिन वगैरे नावे वाचून मराठी वाचकांना आता बिचकल्यासारखे वाटत नाही. हा प्रवाह इ. स. २००१ मध्ये अधिक व्यापक झाल्याचे दिसते.

### महत्त्वाकांक्षी प्रकाशन प्रकल्प

इ. स. २००१ या वर्षात मराठी प्रकाशन क्षेत्रात एकूण वातावरण चैतन्यपूर्ण राहिले असे म्हणण्याचे दुसरे कारण म्हणजे अनेक महत्त्वाकांक्षी व महत्त्वपूर्ण प्रकाशनप्रकल्प उत्तम प्रकारे या वर्षात पार पडले. काही प्रकल्पांना तर विक्रमी प्रतिसाद मिळाला.

शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या राजा शिवछत्रपती या पुस्तकाची नवी आवृत्ती प्रकाशनपूर्व सवलत योजनेत ३४ हजार प्रतींची मजल गाठणारी ठरली. हा एक विक्रमच मानावा लागेल. लोकप्रिय पुस्तके योग्य किंमतीत दिली गेली तर वाचक ग्राहकांचा उदंड प्रतिसाद मिळतो.

शिवछत्रपती चरित्र हा मराठी मंदिरचा गेल्या चाळीस वर्षांचा संकल्प. त्याला आता खरी पूर्तता लाभण्याचा क्षण जवळ येत आहे. इतिहासकार शेजवलकर यांनी त्याचा आरंभ केला. परंतु त्यांच्या देहावसानाने तो अपूर्ण राहिला. डॉ. य. दि. फडके यांना समन्वयक संपादक नेमून डॉ. मधुकर श्रीपाद माटे, डॉ. कंटक, डॉ. गोविंद कुलकर्णी, डॉ. कमल चव्हाण, यांच्याकडे लेखनाची जबाबदारी सोपवली. त्यानुसार पहिला खंड मॅकमिलन या विश्वविख्यात प्रकाशन संस्थेतर्फे प्रसिद्ध झाला आहे. तो शिवपूर्व तीनशे वर्षातील महाराष्ट्राच्या राजकीय, सांस्कृतिक स्थितीचा आढावा घेणारा आहे.

शिवछत्रपती हे मूळचे सिसोदिया राजपूत असे सारेजण मानतात. पण पुण्याचे एक कल्पक लेखक संशोधक डॉ. रा. चिं. ढेरे यांनी दक्षिणेतील होयसळ राजांशी त्यांचे नाते सांगण्यासाठी शिखर शिंगणापूर या पुस्तकात एक युक्तिवाद पेश केला आहे. त्यांच्या तल्लख कल्पनाशक्तीची एक भन्नाट भरारी यापलीकडे त्यात तथ्यांश नसावा असेच वाटते. शिखर शिंगणापूर हे शिवरायांचे कुलदैवत. त्याबद्दलही काही जुने संदर्भ डॉ. ढेरे देतात.

समकालीन अस्सल कागदपत्रांच्या आधारे संभाजी राजांचा परिचय करून देण्याचा प्रयत्न डॉ. एस. एस. शिवदे यांनी केला आहे. शिवरायांच्या मृत्यूनंतर रायगडावर जे कौटुंबिक शीतयुद्ध घडले त्यावरून सोयराबाईच्या मनात संभाजी राजांना गादीवर बसवू नये असे होते असा ग्रह होतो; अंत्यसंस्काराच्या वेळी संभाजीराजांना बोलवले जात नाही; दहा वर्षाच्या राजारामाच्या हस्ते ते होतात. मात्र राजारामाला मंचकावर बसवण्याचा बेत संभाजीराजे हाणून पाडतात. २० जुलै १६८० रोजी ते मंचकारोहण करतात. कवी कलश व अकबर यांच्यातील पत्रव्यवहार, मर्यादित आत्मकथनच ठरेल असे बाकरे भटजींना दिलेले मानपत्र, जयपूरचा राजा रामसिंग यांना लिहिलेले संस्कृत पत्र, वेगवेगळे नकाशे, मूळ कागदपत्रे (संभाजीराजे राजगडावर सुखरूप पोचले तेव्हाचे पत्र), अंत्रुजचा शिलालेख, शिर्क्यांचे वतनपत्र, समाधी व्यवस्था यामुळे या प्रयत्नाचे मोल वाढले आहे.

राजर्षी शाहू महाराजांबद्दलचे ६२ लेख, त्यांची भाषणे, त्यांची काही हुकूमपत्रे, आज्ञापत्रे, २१० छायाचित्रे, यांचा समावेश असलेला ११७५ पृष्ठांचा, हजार रुपये किंमत असलेला राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ हा अभ्यासकांना मौल्यवान खजिनाच वाटेल.

दक्षिण भारतीय मराठी साहित्य हा प्रकल्प राज्य मराठी विकास संस्थेने हाती घेतला होता. त्याची सांगता करणारा डॉ. वसंत जोशी व डॉ. पुंडे संपादित ग्रंथ प्रसिद्ध झाला. मराठीच्या अभ्यासाला एक नवे परिमाण लाभले.

यंदा अभ्यासपूर्ण असे अनेक प्रकल्प सिद्ध झाले, त्यांची नोंद करायला गेले तर कितीतरी नावे सहज समोर येतात.

१. वि. स. खांडेकर यांचा सचित्र चरित्रपट जया दडकर यांनी तयार केला. देशमुख आणि कंपनीने तो काढला. खांडेकरांच्या जन्मापासून वर्षनिहाय घटनांची नोंद त्या त्या वेळची छायाचित्रे वगैरे देऊन केली आहे. हे एक अफाट काम आहे. डेमी चतुर्थांश आकारातील अडीचशे पृष्ठांचे हे पुस्तक म्हणजे जया दडकरांनी गेल्या तीस-चाळीस वर्षात केलेल्या अचाट उद्योगाचे गोंडस फळ आहे.

२. मराठी साहित्य संमेलनाच्या आजवरच्या ७४ अध्यक्षांची भाषणे तीन खंडात दिलीपराज प्रकाशनने एकत्र आणली आहेत. डॉ. रमेश धोंगडे यांनी ती संपादित केली आहेत.

३. आजवर झालेल्या दलित साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांनी केलेल्या भाषणांचे संकलन डॉ. शरणकुमार लिंबाळे यांनी 'दलित साहित्य विचार' या पुस्तकाच्या रूपात दिलीपराज प्रकाशनतर्फे प्रसिद्ध केले आहे.

४. बडोदा येथे १९३० पासून दरवर्षी साहित्य संमेलने होतात. त्यांच्या अठ्ठावन्न अध्यक्षीय भाषणांचा संग्रह 'सयाजीनगरीतील साहित्य-विचार' या नावाने प्रा. गणेश अग्निहोत्री आणि प्रा. दत्तात्रय पुंडे यांनी केला आहे. पुण्याच्या स्नेहवर्धन प्रकाशनने तो प्रसिद्ध केला आहे. दोन खंडांची किंमत ९०० रुपये आहे.

५. भाऊसाहेब खांडेकर यांची शंभरावर पुस्तके जन्मशताब्दी निमित्त पुनर्मुद्रित झाली. तरीही पुस्तकरूपात न आलेले त्यांचे साहित्य उरलेले आहेच. लघुकथा, रूपककथा, लघुनिबंध, दोन कादंबऱ्या इ. त्यांचे संपादन व प्रकाशन करण्याचे मेहता पब्लिशिंग हाऊसने मनावर घेतले आहे. त्यानुसार 'नवी स्त्री' ही कादंबरी, मुखवट्यांचे जग व रानफुले हे ललित लेख



संग्रह, क्षितिजस्पर्श हा ४३ रूपककथांचा संग्रह, स्वप्न आणि सत्य, विकसन, भाऊबीज हे तीन कथासंग्रह – यांचे प्रकाशन होत आहे.

६. डॉ. व. दि. कुलकर्णी यांचे ऑगस्टमध्ये निधन झाले. त्यापूर्वी दोन दिवस म्हणजे २३ ऑगस्टला त्यांच्या पाच पुस्तकांचे प्रकाशन झाले. (पोएट बोरकर, काव्य व काव्यास्वाद, गोदातटीचा अश्वत्थ, नाटक : रंगाविष्कार आणि रंगास्वाद, मराठी साहित्य : विमर्श आणि विमर्शक) पंचाहत्तरीच्या टप्प्यावर प्रकाशित झालेल्या या पुस्तकांतून गेल्या शतकातील मराठी साहित्यविश्वाचा एक आस्वादक फेरफटका घडतो.

७. 'एक होता कार्व्हर'च्या अठराव्या डीलक्स आवृत्तीचे प्रकाशन-- आजवर एक लाखावर प्रती खपलेले हे पुस्तक. दुर्मिळ चित्रांसह नव्या डीलक्स आवृत्तीची नोंदणी १३ हजारावर झाली हाही एक विक्रमच! या आवृत्तीच्या माध्यमातून शिक्षण व अन्य क्षेत्रातील प्रयोगांना प्रोत्साहन देण्यासाठी एका ट्रस्टचीही निर्मिती होणार आहे.

८. 'कृषिज्ञानकोशा'चा पहिला खंड अशोक महादेव जोशी यांनी सिद्ध केला. शासकीय मदत नसतानाही भारतीय संस्कृतिकोश पं. महादेवशास्त्री जोशी यांनी अल्पकाळात पूर्ण केला. त्यांचे चिरंजीव अशोक यांनी हाती घेतलेल्या १५ खंडाचा हा कोश एकूण पाच कोटी खर्चाचा आहे.

९. मधु मंगेश कर्णिक (मधुघट), शिवाजी सावंत, पु. ल. देशपांडे, डॉ. रा. चिं. ढेरे, नटवर्य चंद्रकांत, कविवर्य अनिल व वि. सा.वाळिंबे प्रभृतींवरील लेख व समीक्षा यांची संकलने हीही अभ्यासकांच्या दृष्टीने उपयुक्त अशी निघाली आहेत. 'चतुष्ट्यसंबंधी' मध्ये राजन गवस यांनी भालचंद्र नेमाडे यांच्या चार कादंबऱ्यांवरील लेख एकत्र केले आहेत. ह. मो. मराठे यांच्या निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी या कादंबरीवरील समीक्षा लेखांचे संकलनही मॅजेस्टिक तर्फे येत आहे. 'स्वामी' वरील समीक्षात्मक लेखनही मेहता पब्लिशिंग हाऊसने एकत्रित स्वरुपात वाचकांसमोर ठेवले आहे. दासगणू महाराजांवरील लेखन मधुकर जोशी यांनी संपादित केले आहे. य. गो. जोशी यांच्या शताब्दीनिमित्त 'पुनर्भेट'च्या भागांचे प्रकाशन झाले; तसेच त्यांच्यावरील पुस्तकांचेही!

११. मुस्लीम मनांचा मागोवा हे अभ्यासपूर्ण पुस्तक वाचकांनी योग्य त्या परिप्रेक्ष्यात स्वीकारावे यासाठी शेषराव मोरे यांनी अभिनव दक्षता घेतली. त्यांनी पुस्तकाची एक प्रसिद्धीपूर्व आवृत्ती काढून ती मुस्लिम व इतर अभ्यासकांना पाठवली. त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेऊन योग्य ते बदल करून नंतरच पहिली अधिकृत आवृत्ती प्रसिद्ध केली. कुराण, हदीस व महंमद पैगंबरांचे चरित्र तसेच शिकवण यांचा समग्र अभ्यास करणारे मराठीतील हे पहिलेच पुस्तक म्हणावे लागेल. स्वत: लेखकालाच अशा पुस्तकांसाठी प्रकाशकाचीही जबाबदारी स्वीकारावी लागते. हेही एक सांस्कृतिक वास्तव यामुळे लक्षात येते. छोटी-मोठी अभ्यासपूर्ण पुस्तके आता स्वत: लेखकच बहुतांशी प्रसिद्ध करू लागले आहेत. प्रस्थापित प्रकाशकांचा योग्य तो प्रतिसाद मिळत नसल्याने आणि प्रकाशकांकडून आर्थिक सहाय्याची मागणी होत असल्याने स्वत:च पुस्तक काढण्याची पाळी हौशी लेखकांवर येत आहे. त्यामुळे पुस्तक प्रकाशन क्षेत्रात 'अव्यावसायिकांचा' वावर वाढत आहे. त्यातून निर्मितीबाबतचा चालढकलपणा, शुद्ध लेखनाची उपेक्षा व प्रकाशनोत्तर विक्रीबाबतची अगतिकता, कमिशनबाबतचे अराजक-- इत्यादी अनिष्ट प्रवृत्तींना खत-पाणी मिळत आहे.

महाराष्ट्र फाउंडेशन, युगांतर वगैरे लाखालाखांचे पुरस्कार, प्रियदर्शनी-दमाणी-मारवाडी संमेलन वगैरे पुरस्कार, महाराष्ट्र शासन व इतर संस्थांचे पुरस्कार यामुळेही वातावरण उत्फुल्ल राहते. वेगवेगळी लहान-मोठी साहित्य संमेलने, प्रकाशन सोहळे, चर्चासत्रे, कविसंमेलने, टेलिव्हिजन-रेडिओवरचे कार्यक्रम, मेळावे, ग्रंथप्रदर्शने हे सर्व या उत्साहाला पोषक ठरतात. म्हणूनच दूरदर्शनच्या आक्रमणाचा फारसा बाऊ करण्याचे कारण नाही, प्रकाशन व्यवसायाचे भविष्य आणखीही आशादायक आहे असे वाटते.

संपादक-


T BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किंमतीत मिळवा!

## विश्वभाषा इंग्रजीतील दर्जेदार साहित्य मराठीत आणून मराठीला संपन्न करणारा टी बुक क्लब

या बुक क्लबचे सभासद **४० रु.** भरून होता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासद झाल्यास ही पुस्तके आपण निम्म्या किंमतीत मिळवू शकता.

या क्लबमधील पुस्तके जसजशी प्रकाशित होतील, तसतशी आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाते.

**ही सर्व सहाही पुस्तके घेणे आपल्यावर बंधनकारक राहील.** या सहा पुस्तकांपुरती ही सभासद फी मर्यादित राहील. पुढच्या बुक क्लबसाठी नव्याने फी भरावी लागेल. या क्लबच्या सभासदांना आमच्या प्रकाशनाची इतर पुस्तके २५% सवलतीत मिळू शकतील.

आत्तापर्यंत फ्रेडरिक फोरसिथ, जेफ्रे आर्चर, मायकल क्रायटन, रिचर्ड प्रेस्टन, ॲगाथा ख्रिस्ती, रॉबिन कुक, आयर्विंग वॅलेस, हॉल केन, मारिओ पुझो यासारख्या जगात लोकप्रिय ठरलेल्या लेखकांच्या उत्तम कलाकृतींचे उत्कृष्ट अनुवाद **'टी'** क्लब योजनेतून वाचकांना सादर केले गेले आहेत व ते लोकप्रिय ठरले आहेत.




## टी बुक क्लब १० मधील उपलब्ध तीन पुस्तके

**४० रु.** सभासद फीसह तीनही पुस्तकांची सभासदांसाठीची एकूण रक्कम ३६५रु. भरा व टी-बुक क्लब १०चे सभासद व्हा. सभासदांना आमची इतर पुस्तके २५% सवलतीत! शिवाय फक्त टी बुक क्लबच्या सभासदांसाठी असलेल्या योजनांचा लाभ!

**अधिक माहितीसाठी संपूर्ण सूची मागवा.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस,** १२१६,सदाशिव पेठ,मुलांच्या भावेहायस्कूलजवळ,पुणे-३०.
फोन : ४४७६९२४ **Email - mehpubl@vsnl.com**




साहित्यवार्ता

## गोरगरीब आणि मध्यमवर्गीय यांना ज्ञानाचे महामार्ग खुले : शरद पवार

''धनसंपत्तीऐवजी ज्ञान हेच भांडवल आहे, ही संकल्पना आता रुजू लागली आहे. गोरगरीब-मध्यमवर्गीयांना ज्ञानाचे महामार्ग खुले झाले आहेत. जगातील सर्व ज्ञान तुमच्यापर्यंत पोचू शकते. त्याची नोंद सर्वांनी घेतली पाहिजे,'' असे प्रतिपादन शरद पवार यांनी शंकर महाराज कंधारकरनगर येथे केले.

कंधार येथील बाविसाव्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे उद्घाटन श्री. पवार यांच्या हस्ते झाले. संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. सुहासिनी इर्लेकर, स्वागताध्यक्ष शंकरअण्णा धोंडगे, मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष कौतिकराव ठाले-पाटील, कविवर्य ना. धों. महानोर, माजी संमेलनाध्यक्ष लक्ष्मीकांत तांबोळी, भगवंतराव देशमुख, प्र. ई. सोनकांबळे व्यासपीठावर उपस्थित होते.

पवार म्हणाले, ''जगाची संकल्पना बदलत चालली आहे. ज्ञानाचे महामार्ग आता खुले झाले आहेत. अशा वेळी गोरगरीब कुटुंबांतील मुलांनी त्याचा फायदा घेऊन बौद्धिक संपदा वाढविली पाहिजे. कोणत्याही प्रदेशाची संपन्नता आता त्या प्रदेशातील साहित्यविषयक व सांस्कृतिक समृद्धीवर ठरत आहे.''

अफगाणिस्तानातील घडामोडींचा संदर्भ देऊन श्री. पवार म्हणाले, ''तालिबानची राजवट असताना जबरदस्त विरोध पत्करून तेथील नागरिक ज्ञानसंपादन करण्याची धडपड करायचे. तशीच परिस्थिती स्वातंत्र्यपूर्व काळात मराठवाड्याने अनुभवली. निजामाच्या राजवटीत मराठी भाषा टिकविण्याचे काम तितकेसे सोपे नव्हते. ती कामगिरी या प्रदेशातील साहित्यिकांनी केली. साहित्यिक संस्थांचा त्यात महत्त्वपूर्ण सहभाग राहिला. त्यात मराठवाडा साहित्य परिषदेचा समावेश आहे. कंधारच्या साहित्य संमेलनाला शेतकऱ्यांचे पाठबळ आहे. हा एक आगळावेगळा प्रयोग आहे.''

श्री. पवार यांनी नरहर कुरुंदकर व ना. गो. नांदापूरकर यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला. संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. इर्लेकर यांनी माहिती-तंत्रज्ञान हा विषय मराठी भाषेला पर्याय होऊच शकत नाही असे सांगितले. त्या म्हणाल्या, ''माहिती व तंत्रज्ञान ही केवळ ज्ञानभाषा आहे. मातृभाषा म्हणजे मानवी मनाचे आणि जीवनाचे महाद्वार आहे. मानवी मनाच्या ज्ञानग्रहणाचे ते माध्यम आहे.'' संमेलनाचे माजी अध्यक्ष लक्ष्मीकांत तांबोळी यांचेही भाषण झाले.

ग्रंथदिंडीसमोर वैजापूर (जि. औरंगाबाद) येथून आलेले नारायण पिराजी खडके यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यांनी धनगरी वेष परिधान केला होता. तसेच त्यांनी सरस्वतीचे प्रतीक असलेली दौत व मोरपिसाची लेखणी असलेली काठी बोटावर तोल सांभाळत, तालात मोहक नृत्य केले. त्यांच्या गळ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा गौरवग्रंथही होता. ग्रंथदिंडीत एका उत्साही कवीने सुरवातीपासून शेवटपर्यंत खड्या आवाजात कविता सादर केल्या.

रविवारी सकाळपासूनच संमेलनस्थळी साहित्यप्रेमींना गर्दी केली होती. ग्रामीण भागातून आलेल्या नवोदित साहित्यकांनी व साहित्य प्रेमींनी पुस्तकांच्या स्टॉलवर एकच गर्दी केली होती.

कंधार तालुका व परिसरात कोणत्याही कार्यक्रमात व संमेलनाला किंवा मेळाव्याला जायचे असेल, तर वाजतगाजत मिरवणुकीने जाण्याची प्रथा आहे. संमेलनस्थळी तालुका व जिल्ह्यातील अनेक गावातील साहित्यप्रेमी व इतर नागरिक वाहनातून वाजतगाजत आले होते.

## 'वृत्तपत्रांचा चेहरा बदलला, तरी पत्रकारितेची मूलतत्त्वे कायम'

विज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे वृत्तपत्रांचा चेहरामोहरा बदलला असला, तरी पत्रकारितेची मूलतत्त्वे कायम आहेत, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले. ज्येष्ठ पत्रकार अनंतराव पाटील यांनी लिहिलेल्या 'मराठी पत्रे, पत्रकार, पत्रकारिता' आणि 'शबाना' या पुस्तकांचे प्रकाशन. त्यांच्या हस्ते झाले.

''पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांना आणि पत्रकारांना मार्गदर्शक ठरेल, असे पुस्तक श्री. पाटील यांनी लिहिले आहे. त्यांच्या साठ वर्षांच्या कारकिर्दीतील अनुभवांतून आणि चिंतनातून झालेले हे लेखन आहे,'' असे प्रतिपादन श्री. पवार यांनी केले. ते म्हणाले, ''आपल्याकडे पत्रकारितेची मोठी परंपरा आहे. आजच्या पत्रकारितेशी त्याची तुलनाही होते. तंत्रज्ञानामुळे माध्यमांचे स्वरूप बदलले आहे. वृत्तपत्रे आणि दूरचित्रवाणी वाहिन्या यांच्यातील स्पर्धा तीव्र झाली आहे. या स्पर्धेत टिकून राहण्याची धडपड सर्वांनाच करावी लागत आहे. त्यासाठी तंत्रज्ञानाचा आणि व्यवस्थापकीय तंत्रांचा अवलंब करणे अपरिहार्य आहे. असे असले, तरी मूलत: पत्रकारितेची कार्ये बदलली नाहीत. ती परिणामकारकतेने कशी करावीत, यासाठी अनंतरावांचे पुस्तक उपयुक्त आहे. अनंतरावांनी पत्रकारिता गाजविली आहे. साधे-सोपे; तरीही परिणामकारक लिखाण ते करतात, स्वच्छ आणि स्पष्ट भूमिका घेऊन ते लिहितात. मूलभूत हक्कांची कोठे गळचेपी झाली असेल, तर त्यावर कडाडून हल्ला करतात. आणीबाणीच्या वेळी त्याचा अनुभव आला आहे.''

विजया पाटील म्हणाल्या, ''आज पत्रकारितेच्या क्षेत्रात असलेल्या सर्वांना अनंतरावांकडून शिकण्यासारखे खूप काही आहे. त्यांच्या पुस्तकातून हे वारंवार जाणवते. या पुस्तकात त्यांनी मांडलेले अनुभव आजही येतात. वृत्तपत्रांमधील स्पर्धा वाढली आहे. तंत्रज्ञानामुळे स्वरूप बदलते आहे. दूरचित्रवाणी आणि इंटरनेट ही माध्यमे आली आहेत. या सर्व आव्हानांना एकाच वेळी तोंड द्यावे लागत आहे. डॉ. नानासाहेब परुळेकरांची परंपरा पुढे चालवीत 'सकाळ' या आव्हांनांना सामोरे जात आहे. मात्र, हे करताना 'सकाळ'ने आपली पातळी कधी सोडलेली नाही.''

अनंतरावांनी विकास पत्रकारितेचा आदर्श घालून दिला; संयमी आणि वैचारिक पद्धतीने त्यांनी पत्रकारिता केली, असे डॉ. पवार यांनी सांगितले, 'शबाना' या पुस्तकाबद्दल प्राचार्य बाळ गाडगीळ यांनी विचार व्यक्त केले. ते म्हणाले, ''अनंतरावांच्या कथालेखनात कृत्रिमता नाही. आशयघन अशा व्यक्तिरेखा त्यांनी उभारल्या आहेत.''

पत्रकारितेवर मराठीतून पुस्तक उपलब्ध करून देण्याची गरज श्री. पाटील यांनी मनोगतात व्यक्त केली. आतापर्यंत आपण २४ पुस्तके लिहिली आहेत; पंचविसावे पुस्तक इंदिरा गांधी यांच्यावर लिहिणार आहोत, असे त्यांनी नमूद केले. विशाल सह्याद्रि ट्रस्टचे सचिव ज्ञानेश्वर खैरे यांनी प्रास्ताविक केले. मीरा प्रकाशनचे प्रकाश भोईटे यांनी आभार मानले.



## आदर्श व्यक्ती पुरस्कार नसीमा हुरजूक यांना जाहीर

कोल्हापूर येथील हेल्पर्स ऑफ दि हँडिकॅप्ड संस्थेच्या अध्यक्षा नसीमा हुरजूक यांना त्यांच्या कार्यासाठी अनुकरणीय आदर्श व्यक्ती (रोल मॉडेल) हा राष्ट्रीय पुरस्कार

नवी दिल्लीत उपराष्ट्रपती कृष्णकांत यांच्या हस्ते तीन डिसेंबरला देण्यात आला. दरम्यान, अमेरिकेतील न्यूयॉर्कमधील महाराष्ट्र फाउंडेशनच्या वार्षिक निधिसंकलन कार्यक्रमासाठी हुरजूक यांना निमंत्रित करण्यात आले. न्यूयॉर्कमधील महाराष्ट्र फाउंडेशनचा वार्षिक निधिसंकलनाचा कार्यक्रम न्यूजर्सी जसा येथे आठ डिसेंबरला झाला. त्यासाठी जगभरातील चारशे सदस्य उपस्थित होते. हुरजूक तेथे हेल्पर्स संस्थेचे प्रकल्प मांडले. संस्थेला विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसाठी निधीची आवश्यकता आहे. प्रकल्प, त्यांचा हेतू व त्याची आवश्यकता यांचा विचार करून उपस्थित सभासद त्यासाठी देणगी जाहीर करतात. निधिसंकलन कार्यक्रमात मुंबईतील प्रा. पुष्पाताई भावे या प्रमुख पाहुण्या म्हणून, तर शिकागो येथील डॉ. अनिता देशमुख व हुरजूक विशेष पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

## ख्रिस्ती साहित्याला मोकळ्या हवेत श्वास घेऊ द्यावा– हुसळे

''भारतीय ख्रिस्ती साहित्यिक व त्यांच्या साहित्यकृतींना धर्म बंधनात टाकण्याचा प्रयत्न करू नये. साहित्यिकांना समाजाच्या मोकळ्या हवेत श्वास घेऊ द्यावा'', अशी अपेक्षा मराठी ख्रिस्ती साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्रा. देवदत्त हुसळे यांनी मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनाच्या समारोपप्रसंगी बोलताना व्यक्त केली.

मराठी ख्रिस्ती साहित्य परिषदेच्या विद्यमाने ख्रिश्चन सोशल फेडरेशनच्या वतीने नगरला हे संमेलन आयोजित करण्यात आले. ख्रिस्ती साहित्यिकांची नाळ समाजाशी जुळलेली असावी. प्रारंभी ख्रिस्ती साहित्यिक धर्मोपदेशकांच्या बंगल्याच्या कुंपणात बांधले गेले. त्यांना खरी गरज आहे ती समाजात मोकळा श्वास घेण्याची. धर्माची जोखडे त्यांच्यावर नकोत. भारतीय ख्रिस्ती हे प्रथम भारतीय, नंतर ख्रिस्ती आहेत. साहित्यिकांनीही आधी भारतीय संस्कृती व नंतर आम्हाला पेलवेल अशी आमची ख्रिस्ती संस्कृती अशी नाळ जोडावी, असे मत त्यांनी व्यक्त केले.

साहित्य परिषदेच्या आगामी वाटचालीबद्दल प्रा. हुसळे म्हणाले की, परिषदेचे कार्य गावोगावी ख्रिस्ती साहित्य मंडळाच्या रूपाने पोहोचवायचे आहे. परिषदेची स्वतंत्र वास्तू असावी. तेथेच नव्या-जुन्यांची साहित्य निर्मिती व आध्यात्मिक साहित्य एकत्र उपलब्ध व्हावे. आमची आदरस्थाने असलेल्या ख्रिस्ती साहित्यिकांच्या दुर्मिळ प्रतिमा संग्रहित असाव्यात. याबरोबरच सर्वसामान्य वाचक डोळ्यासमोर ठेवून साहित्य निर्मितीस प्रोत्साहन मिळावे.

परिषदेचे अध्यक्षपद आपल्यासारख्या ग्रामीण भागातील साहित्यिकाला मिळाल्याने परिषद खऱ्या अर्थाने 'माहेरवाशीण' झाली आहे. वसई, मुंबईकडे अध्यक्षपद असताना ती 'सासुरवाशीण' होती, असा उल्लेख करून प्रा. हुसळे म्हणाले की, ग्रामीण व नागरी ख्रिस्ती साहित्यिक यांच्यामध्ये वैचारिक दरी होण्याचे मुख्य कारण आहे शहरवासीयांची आर्थिक सुबत्ता आणि अल्पसंपर्क. पोटापाण्याची सोय झाल्याने खेडूत सुधारू लागला आहे. मात्र, दोन्हींतील सामंजस्य वाढत नाही. कारण त्यांच्यात जवळीक व आत्मीयता राहिली नाही. ऐक्यास प्राधान्य दिल्याने अनेक प्रश्न आपोआप सुटतील. धर्मनिरपेक्ष भारतात अल्पसंख्याक धर्माची परवड आहे. त्यामुळे

आपणास धर्मस्वातंत्र्य खरोखर मिळते का? या अनुषंगाने साहित्य निर्मिती व्हावी, दलित साहित्य चळवळीसारखी ख्रिस्ती साहित्य चळवळ उभी राहण्याची प्रेरणा मिळावी, असेही प्रा. हुसळे यांनी सांगितले.

परिषदेच्या मावळत्या अध्यक्षा प्रा. डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांनी नगरच्या संमेलनाने मनात ठसा उमटविल्याचे सांगितले.

## 'तंत्रज्ञानाचा वापर करतानाच मूल्यशिक्षणाची जोड देणे गरजेचे'

''वेगाने बदलत जाणाऱ्या तंत्रज्ञानाच्या तातडीने मागोवा घेत त्याचा शिक्षणात समावेश करीत असतानाच त्याला मूल्यशिक्षणाची जोड देणे गरजेचे आहे,'' असे मत संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांनी व्यक्त केले.

दीपक शिकारपूर यांनी लिहिलेल्या 'बिट्स, बाइट्स आणि तुम्ही' या मराठी पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले.

''व्यवस्थापन, अर्थशास्त्र यापासून ते जैविक तंत्रज्ञान, माहिती-तंत्रज्ञान अशा विविध विद्याशाखांमध्ये एवढ्या झपाट्याने बदल होत आहेत की त्यांची भविष्यकालीन दिशा ठरविणे अवघड झाले आहे. अशा वेळी या बदलांचा अभ्यासक्रमात त्वरेने समावेश करून विद्यार्थ्यांना अद्ययावत ज्ञान देण्याची गरज आहे,''

'जैन इन्स्टिट्यूट ऑफ व्होकेशनल स्टडीज'चे संस्थापक चेनराज जैन म्हणाले, ''यापुढे विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणाच्या मागे न लागता व्यावसायिक शिक्षणाची कास धरली पाहिजे. त्यामुळे त्यांना रोजगार मिळण्याचा मार्गदेखील सुकर होईल. तरुणांनी डॉक्टर, इंजिनिअर, व्यावसायिक, व्यवस्थापक यांसारखे अभ्यासक्रम पूर्ण करून त्याला संभाषणकलेची जोड दिली, तर ते स्वतंत्र व्यवसाय करू शकतात.''

श्री. शिकारपूर म्हणाले, ''माहिती-तंत्रज्ञान व जैवतंत्रज्ञान यांना भरपूर वाव असला, तरी त्याला परदेशी भाषाशिक्षणाची जोड देणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने पुण्यातील विद्यार्थ्यांना या शिक्षणाची उत्तम संधी आहे.''

जैव माहिती-तंत्रज्ञानाला आरोग्य व शेतीक्षेत्रात किती वाव आहे याची माहिती डॉ. एस. डी. रावेतकर व डॉ. व्ही. एस. प्रकाश राव यांनी दिली.

## २४ वे गोमंतक मराठी साहित्य संमेलन

मुक्तिपूर्व काळापासून गोमंतक मराठी साहित्य संमेलने भरवली जातात. सुरवातीची काही संमेलने तर येथे पोर्तुगीज शासन असल्याने गोव्याबाहेर भरवली गेली. त्यांना निर्वासित संमेलने संबोधले जाते. यंदाचे २४ वे गोमंतक मराठी साहित्य संमेलन नुकतेच पाचसात हजार मराठीप्रेमींच्या गर्दीत नऊ ते अकरा नोव्हेंबर दरम्यान दक्षिण गोव्यातील केपे येथे प्रचंड उत्साहात पार पडले. गोव्याचे सहकारमंत्री प्रकाश वेळीप स्वागताध्यक्ष होते. गोव्याच्या मुख्यमंत्र्यांपासून खासदारांपर्यंत अनेकांनी या व्यासपीठावर येऊन आपण मराठीचा अभिमान बाळगून असल्याचे जाहीरपणे सांगितले. गोव्यात मराठी शाळांचे प्रमाण सर्वाधिक आहे. मराठी वृत्तपत्रांचा खप येथे लाखांच्या घरात आहे. मराठीत मोठ्या संख्येने येथे कसदार साहित्यनिर्मिती होते आहे. तरीही मराठीला राजभाषेचे स्थान देण्यात केवळ राजकीय हितसंबंध जपण्यासाठी राज्यकर्ते आजवर कां कू करीत



आले आहेत. या साहित्य संमेलनात मराठी राजभाषेची मागणी पुन्हा एकदा जोरदारपणे मांडली गेली.

संमेलनाध्यक्ष ह. मो. मराठे यांनी अध्यक्षीय भाषणात, गोव्यातील साठ टक्के जनतेची ग्रांथिक व बौद्धिक व्यवहाराची भाषा मराठी असूनही तिला राजभाषेचे स्थान तर नाहीच, पण तिला कोकणीबरोबर समान दर्जाही नाही, ही खंत व्यक्त केली.

गोमंतक मराठी अकादमीचे अध्यक्ष प्राचार्य गोपाळराव मयेकर यांनीही आपल्या भाषणात, गोमंतकाच्या प्राणभूत अशा मराठी भाषेला राजभाषेचे तिच्या हक्काचे स्थान मिळवून द्यावे, असे आवाहन संमेलनाचे उद्घाटक मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर यांना केले. शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्र्यांसमोर घोषणा देत त्यांना एक निवेदनही सादर केले. मुख्यमंत्री पर्रीकर यांना अखेर ''मला या क्षणी भाषेच्या वादात पडायचे नाही. तुमच्या भावनांची जाण असल्याने योग्य वेळेची वाट पाहत आहे. तूर्त मराठीविषयीच्या या लोकभावनेशी संपर्क ठेवून आहे,'' असे सांगावे लागले. मीही मराठी भाषेचा अभिमान बाळगणारा असून, राज्यातील मराठी शाळा योग्य प्रकारे चालाव्यात यासाठी जे करायला हवे ते आम्ही करू, अशी ग्वाही त्यांनी दिली. प्राथमिक स्तरावर प्रादेशिक भाषांतून शिक्षण देणे गरजेचे आहे अशी आपल्या सरकारची भूमिका असल्याचेही त्यांनी सांगितले.

संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी 'मराठीचे गोमंतकातील अस्तित्व : स्थिती आणि गती' आणि 'शैक्षणिक स्तरावरील मराठी : वास्तव आणि भवितव्य' या दोन गोमंतकीय मराठीप्रेमींच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या विषयांवर महत्त्वपूर्ण परिसंवाद झाले. मराठीच्या अस्तित्वाच्या स्थिती आणि गतीविषयी बोलताना ज्येष्ठ पत्रकार नारायण आठवले यांनी गोमंतक मराठी अकादमी आणि गोमंतक साहित्य सेवक मंडळ या साहित्य संस्थांवर टीकेची झोड उठवली. श्री. आठवले यांनी गोमंतक मराठी अकादमीचे अध्यक्ष प्राचार्य गोपाळराव मयेकर यांना उद्देशून व त्यांच्या अनुपस्थितीत काही उद्गार काढल्याने प्रक्षुब्ध होऊन संमेलनाच्या अखेरच्या दिवशी प्राचार्य मयेकर यांनी पत्रकार परिषद घेऊन श्री. आठवले यांच्या आरोपाचे खंडन केले. गोमंतक मराठी अकादमीने साहित्य, कला, संगीत, शिक्षण अशा सर्व क्षेत्रांत केलेल्या कामाची माहिती देताना, 'कोणत्या क्षेत्रात, कोणत्या स्तरापर्यंत अकादमी गेलेली नाही ते आठवले यांनी सांगावे. मुंबईत बसून उंटावरून शेळ्या हाकण्याचा प्रयत्न त्यांनी करू नये,' असे म्हटले.

या संमेलनात डॉ. सुभाष भेंडे आणि विजय कापडी या दोघा गोवेकर लेखकांच्या प्रकट मुलाखतींचाही कार्यक्रम झाला. अन्य अनेक दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रमही सादर झाले.

## संमेलनांतूनच साहित्याला उत्तेजन : बनहट्टी

''साहित्य संमेलन हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य घटक आहे. वाङ्मयावर प्रेम असणाऱ्या विविध स्तरांतील रसिकांचे तेथे संमेलन भरते. त्यातून निर्माण होणाऱ्या आविष्कारातून साहित्याला उत्तेजन मिळते,'' असे प्रतिपादन ७५ व्या नियोजित अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष राजेंद्र बनहट्टी यांनी पुणे येथे केले.

संमेलनाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे प्रा. ना. सं. इनामदार यांच्या हस्ते श्री. बनहट्टी यांचा सत्कार करण्यात आला. साहित्यिक प्रा. बाळ गाडगीळ, समीक्षक डॉ. विलास खोले, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले या प्रसंगी उपस्थित होते.

“साहित्य संमेलनाचे रूपांतर उत्सवात झाल्याची काही जण टीका करतात. पण, उत्सव झाला तर बिघडते काय? उत्सव हे समाजाच्या जागरूकतेचे लक्षण आहे. मराठी भाषिकांसाठी साहित्य संमेलन ही अभिमानाची बाब आहे. निवडणूक हाच अध्यक्षांच्या निवडीचा राजमार्ग आहे. सध्याची निवडणूकपद्धती सर्वसमावेशक असून, योग्यच आहे. संमेलनाध्यक्ष हे मानाचे पद असून, अध्यक्षांची इच्छा असेल तर तो साहित्याला पूरक कार्य करू शकतो. हे अगोदरच्या काही अध्यक्षांनी सिद्ध करून दाखविले आहे,” असे त्यांनी सांगितले.

“श्री. बनहट्टी यांचे गंभीर आणि विनोदी, या दोन्ही वाङ्मय प्रकारांवर प्रभुत्व आहे, त्यांच्या कथा वाचकांना गुंतवून ठेवतात. ‘अखेरचे आत्मचरित्र’ ही त्यांची कादंबरी मराठी साहित्यातील अद्वितीय आहे, त्यामुळेच तिचे अनेक भाषांत रूपांतर झाले,” असे मत प्रा. बाळ गाडगीळ यांनी व्यक्त केले. “बनहट्टी यांची सामाजिक ऋणाची भावना प्रखर आहे, हे त्यांनी अनेक संस्थांना मुक्तहस्ते केलेल्या मदतीने सिद्ध होते. त्यांच्या दीर्घकथाही प्रभावी आहेत. त्यांचे लेखन माणसाच्या ठायी असणाऱ्या मूलभूत भावनांशी निगडित आहे,” असे डॉ. खोले यांनी सांगितले.

डॉ. कोत्तापल्ले म्हणाले, “गेल्या पन्नास वर्षांपासून बनहट्टी लेखन क्षेत्रात असले तरी प्रसिद्धीपासून दूर राहिले आहेत. साहित्य संस्कृती महामंडळाचे अध्यक्ष असताना त्याचे स्वरूप लोकाभिमुख करण्यासाठी त्यांनी मोठे प्रयत्न केले होते. जीवनाला सहजतेने सामोरे जाण्याचा संदेश त्यांच्या लेखनात सातत्याने आढळतो.”

## ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या समस्यांच्या अभ्यासासाठी समिती

राज्य शासनाने राज्यातील ग्रंथालयाच्या विविध समस्यांबाबत अभ्यास करण्यासाठी माजी आमदार व्यंकप्पा पत्की यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली आहे. ग्रंथालय सेवा कार्यक्षम बनविण्यासाठी या समितीच्या वतीने लोकप्रतिनिधी, पत्रकार, साहित्यक्षेत्रातील मान्यवर, ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांकडून मते मागविण्यात आली आहेत.

राज्यातील ग्रंथालयाच्या संदर्भात माहिती घेण्यासाठी समितीने एक प्रश्नावलीही तयार केली असून ती सर्व शासनमान्य ग्रंथालयांकडे पाठविली आहे. ती नागरिकांना माहितीसाठी उपलब्ध करण्यात आली आहे.

## चिंटूच्या प्रदर्शनाला तुफान प्रतिसाद

‘सकाळ’ व पुणे महापालिका यांच्यातर्फे गणेश कला क्रीडा मंचात भरविण्यात आलेल्या ‘चिंटू’च्या प्रदर्शनास लाखावर नागरिकांनी चार दिवसांत भेट दिली. पुणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद या प्रदर्शनास मिळाला.

मुलांसह रिक्षावाल्या काकाला हात करून थांबवल्यानंतर जाण्याचे ठिकाण सांगण्याआधीच “चिंटूच्या प्रदर्शनाला निघालात काय,” अशी विचारणा काकांकडूनच झाल्याचे नागरिकांनी सांगितले. बराच वेळ रांगेत थांबूनही चिंटूची भेट घेतल्याशिवाय कोणी जात नव्हते. सकाळपासूनच रांगा लागल्या होत्या. “या पूर्वी मी मंदिरामध्ये जाण्यासाठीसुद्धा कधी रांगेत उभी राहिले नाही; पण चिंटूच्या भेटीसाठी मात्र रांगेतून आले अन् हसत-हसत टेन्शन फ्री होऊन बाहेर पडले,” असे मत स्नेहलता जगताप यांनी नोंदविले. प्रदर्शनात प्रवेश मिळण्यासाठी रांगेत उभे राहण्याची वेळ येऊनही कोणाचाही तक्रारीचा सूर नव्हता. हॉलमध्ये येऊन चिंटूला पाहिले व पाय दुखायचे केव्हाच थांबले असा अनुभव प्रत्येकाला आला.



घरातील आजी-आजोबा, बच्चे कंपनीसह सारे कुटुंब प्रदर्शनात फिरते. चिंटूच्या विनोदांना हसून प्रतिसाद देत ही मंडळी चिंटूच्या दोस्तांबरोबर छायाचित्रे काढण्यात रममाण झाली.

चिंटूने जीवनामध्ये निखळ, निर्लेप, हास्यबगीचा फुलवला. “चिंटूला पाहिलं, की स्वत:लाच आरशात पाहिल्यासारखं वाटतं. मी पण चिंटूसारखाच आहे, असे माझी आई म्हणते,” अशी भावना आदित्य बापट या विद्यार्थ्याने व्यक्त केली. ज्येष्ठ चित्रकार रवी परांजपे म्हणतात, “छोटासा चिंटू किती मोठा आहे, ते आज समजलं.”

## ज्ञानेश्वरीच्या रूपाने विश्वकल्याणाचा विचार : डॉ. पठाण

तेराव्या शतकात सुबत्ता होती, लोक संपन्न होते, तरी त्या वेळी धर्माचा प्रसार समाजाच्या तळापर्यंत पोचला नव्हता. तत्कालीन समाजजीवन बारकाईने न्याहाळून, धर्माचा विचार सामान्यांपर्यंत नेण्याकरिता व धर्मांध समाजाचा विरोध पत्करून संत ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या रूपाने विश्वकल्याणाचा विचार मांडला, असे संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. यू. म. पठाण यांनी सांगितले.

उरुळीकांचन येथील स्वामी विवेकानंद प्रतिष्ठानच्या वतीने डॉ. मणिभाई देसाई यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हेमंतमणी व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. तिचे पहिले पुष्प गुंफताना डॉ. पठाण बोलत होते. जिल्हा पोलिस प्रमुख डॉ. माधवराव सानप व ‘बायफ’चे अध्यक्ष डॉ. एन. जी. हेगडे उपस्थित होते.

डॉ. पठाण म्हणाले, “ज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरीत धर्म व अध्यात्माची सांगड घालण्यात आली आहे, त्याचे विघटन होऊ दिले नाही. शिष्यांची जात, धर्म, नावे, रूप व आकार वेगवेगळे असावेत, तरी सर्वांचे आचरण एकच आहे. त्या काळात कर्मांवर आधारित समाजाची विभागणी करण्यात आली होती. मनुष्याच्या गुणाला महत्त्व न देता त्यांचा वर्णामध्ये भेद निर्माण करण्यात आला होता. अशा समाजातील मनुष्याच्या मार्गातील अडथळा दूर करण्याचा प्रयत्न ज्ञानदेवांनी केला. त्यासाठी त्यांना धर्मांध समाजाचा त्रासही सोसावा लागला.”

“जगातील ज्ञान ज्ञानेश्वरीमध्ये. ज्ञानाचे पावित्र्य ज्ञानातच असते. ज्ञानदेवांनी प्रपंच केला नाही; परंतु त्यांनी आपल्या ग्रंथात प्रापंचिक दाखले दिले आहेत. मनुष्याने कर्म करत असताना भक्तीही केली पाहिजे. भक्ती करण्याचा अधिकार सर्वांना आहे. कर्मातील भक्तीमध्येच परमेश्वर सामावला आहे. कर्म व भक्तीचे महत्त्व सांगणारे आज दोनच ग्रंथ आहेत, ते म्हणजे गीता व ज्ञानेश्वरी. हे दोन्ही ग्रंथ लोकभाष्य बनले आहेत. ज्ञानदेवांनी आपल्यापर्यंत पोचविलेल्या या ग्रंथाचे महत्त्व पटले असल्याने आपण आज ज्ञानदेवांना माऊलींच्या रूपात पाहतो.”

## अजूनही गाणी मनासारखी झाली नाहीत : शांता शेळके

“अजूनही माझी गाणी मनासारखी झालीत असे वाटत नाही,” अशी खंत ज्येष्ठ कवयित्री शांताबाई शेळके यांनी व्यक्त केली. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा पुरस्कार मिळाल्याप्रीत्यर्थ ‘वनराई’ने राज्याचे शालेय शिक्षण आणि सांस्कृतिक मंत्री रामकृष्ण मोरे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार केला.

दैनिक ‘सकाळ’च्या सरव्यवस्थापिका विजया पाटील प्रमुख पाहुण्या होत्या. उद्योगपती बी.

जी. शिर्के, सिंबायोसिसचे संस्थापक अध्यक्ष शां. बा. मुजुमदार, कवयित्री अरुणा ढेरे, ज्येष्ठ नाट्यसमीक्षक गो. रा. जोशी आदी मान्यवर उपस्थित होते. घरातील गाणी, कविता आणि ओव्यांत आपल्या कवितेचा उगम असल्याचे कवयित्री शेळके यांनी या वेळी सांगितले. शांताबाईंचे महाराष्ट्रावर मोठे ऋण असल्याचे श्री. मोरे म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साधना श्रॉफ यांनी केले.

## साने गुरुजींचे वाङ्मय म्हणजे मूल्य शिक्षणाचा वस्तुपाठ

महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्राचे साने गुरुजी हे मातृहृदय होते. साने गुरुजींचे वाङ्मय संस्कार आणि मूल्यशिक्षणाचा वस्तुपाठ आहे. शामची आई ही कादंबरी संस्काराचा अमृतकुंभ आहे, असे मत राष्ट्रपती पुरस्कार विजेते शिक्षक डॉ. रा. गो. प्रभुणे यांनी व्यक्त केले. संग्रामनगर येथील मोहिते-पाटील विद्यालयात साने गुरुजी यांच्या जीवनावर आयोजित व्याख्यानमालेत. डॉ. प्रभुणे म्हणाले, साने गुरुजींची शामची आई ही कलाकृती कुमारांच्या विश्वात अमर कलाकृती आहे. गुरुजी म्हमजे महाराष्ट्र शारदेला पडलेले गोड स्वप्न होते.

## 'मराठी संस्कृतीच्या जोपासनेसाठी मराठी भाषकांनीच पुढाकार घ्यावा'

मराठी संस्कृती व भाषेच्या जोपासनेसाठी मराठी भाषकांनीच पुढाकार घ्यायला हवा, असे प्रतिपादन केंद्रीय मनुष्यबळ विकास राज्यमंत्री सुमित्रा महाजन यांनी भोपाळ येथे केले.

मध्य प्रदेश मराठी साहित्य संघाचे सहावे अधिवेशन नुकतेच भोपाळ येथे पार पडले.

''हिंदी भाषक पट्ट्यात राहणाऱ्या मराठी माणसांनी हिंदी ज्याप्रमाणे आत्मसात केली, त्याप्रमाणेच मूळ मायमराठीच्या जोपासनेसाठी व संवर्धनासाठी प्रयत्न केले पाहिजेत. हिंदी भाषक पट्ट्यात किंवा इतरत्रही मराठी माध्यमाच्या शाळा उघडण्याची धडपड केली पाहिजे. त्यामुळे बालवयापासूनच मुलांवर मायभाषेचे चांगले संस्कार घडतील,'' असे त्या म्हणाल्या.

## ई-लेखक!

सध्या लेखकांसाठी खरोखरच सुकाळ आहे. टीव्हीवरील निरनिराळ्या मालिकांसाठी अनेक नवोदितांनी आपल्या लेखणीचं पाणी तर दाखवलं आहेच, पण आता इंटरनेटवरही अनेक पुस्तकं प्रसिद्ध होऊ लागली आहेत आणि लिखाणाच्या विविध स्पर्धाही तिथं होताहेत. त्यामुळे आजपर्यंत केवळ वर्तमानपत्रं, मासिकं, पुस्तकं अशा छापील आणि खर्चिक माध्यमावरच अवलंबून असणाऱ्या 'लेखकांना' एक विस्तृत असं नवं व्यासपीठ मिळालं आहे. हे झालं स्वत:च्या लिखाणाबद्दल. पण याच माध्यमातून अनेक नामवंत लेखकांच्या पंक्तीत जाऊन बसण्याची संधीही अनेकांना उपलब्ध झाली आहे.

आता हेच उदाहरण पाहा. 'डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.ऑक्सफर्डबुकस्टोअर.कॉम' या साईटनं 'ई-लेखका'साठी एक अभिनव स्पर्धा जाहीर केली. 'आय ऑफ द नीडल', 'गॉन विथ द विंड', 'लेडी चॅटर्लीज लव्हर' आणि 'टेल ऑफ टू सिटीज' या जगप्रसिद्ध कादंबऱ्यामधील शेवटच्या प्रकरणाला वेगळा रंग द्यायचा आणि आपल्या मनाप्रमाणं त्याचा शेवट करायचा. परीक्षकांना जो शेवट 'गोड' वाटेल तो विजेता! या मार्गानं आपणही आपल्या लेखणीचं पाणी जोखू शकता!



## रंगनाथ कुलकर्णी यांची पंचाहत्तर वर्षे पूर्ण

एकपात्री प्रयोगाचे लोकप्रिय कलाकार आणि ज्येष्ठ पत्रकार रंगनाथ कुलकर्णी यांच्या वयाची ७५ वर्षे १७ नोव्हेंबरला पूर्ण झाली आहेत.

मूळचे नगरचे असलेले कुलकर्णी १९४९ पासून पत्रकारितेच्या क्षेत्रात आहेत. त्यांच्या 'एका गाढवाची कहाणी' या प्रयोगाची अनेक समीक्षकांकडून प्रशंसा झाली. श्री. कुलकर्णी यांनी याबरोबरच 'सुदाम्याचे पोहे', 'गोष्टी बाबांच्या, बोल बाबांचे', 'चार्ली चॅप्लिन', 'साहेब यशवंतराव (चव्हाण)', 'चिमणराव', 'साने गुरुजी' आणि 'मराठी विनोदाची शंभर वर्षे' अशा विविध एकपात्री प्रयोगांचे सुमारे अडीच हजार कार्यक्रम सादर केले आहेत.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी १९०२ मध्ये 'साक्षीदार' हा पहिला मराठी विनोदी लेख लिहिला. या पार्श्वभूमीवर कुलकर्णी यांनी 'हास्यरंग' या नव्या कार्यक्रमाचे तीन प्रयोग गोव्यात केले.

## 'सांस्कृतिक प्रगती झाल्यास शांतता परिषदेची गरज नाही'

समाजाची सांस्कृतिक प्रगती झाल्यास शांतता परिषदेची आवश्यकता भासणार नाही, असे निवृत्त मेजर जनरल गो. ना. खरे यांनी कँटोन्मेंट भागातील सिद्धार्थ वाचनालय आणि ग्रंथालयाच्या वतीने आयोजित केलेल्या दिवाळी अंक व ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करताना म्हटले.

''सामाजिक प्रगतीसाठी साहित्यनिर्मिती आणि रसग्रहण करणारा वाचक वर्ग निर्माण झाला पाहिजे. ज्ञानसाधनेच्या प्राप्तीसाठी लागणारी वृत्ती निर्माण करण्याची व लोकांना शहाणे करून सोडण्याची ताकद ग्रंथालयात असते.''

पोलिस उपायुक्त विक्रम बोके, ज्येष्ठ पत्रकार वसंत काणे, मोहम्मद हुसेन जीना, पुण्याचे सहाय्यक ग्रंथालय संचालक एस. एन. कांबळे आदींनी आपले विचार व्यक्त केले.

## प्रकृतीच्या कारणास्तव डॉ. फडकुले यांचा राजीनामा

राज्य मराठी भाषा विकास संस्थेच्या संचालकपदाचा डॉ. निर्मलकुमार फडकुले यांनी राजीनामा दिला.

डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार प्रकृतीच्या कारणास्तव १५ डिसेंबरपासून आपल्याला संचालकपदाच्या जबाबदारीतून मुक्त करावे, अशी विनंती करणारे पत्र त्यांनी शिक्षणमंत्र्यांना पाठविले. ''केवळ प्रकृतीच्या कारणास्तव'' मी ही विनंती सरकारला केली आहे. त्यामागे अन्य कोणतेही कारण नाही.

## 'वैज्ञानिक प्रगतीबरोबरच समाजविकास निगडित असावा'

''विज्ञानाच्या प्रगतीबरोबर सामाजिक विकास होईलच असे नाही, मात्र तो व्हावा अशी अपेक्षा बाळगण्यात गैर नाही,'' असे प्रतिपादन विज्ञानलेखक लक्ष्मण लोंढे यांनी विज्ञान गप्पात बोलताना केले.

बन्सीलाल रामनाथ अग्रवाल ट्रस्ट आणि विज्ञान संवर्धन मंडळ यांनी आयोजिलेल्या 'विज्ञानगप्पा' कार्यक्रमामध्ये डॉ. बाळ फोंडके, लक्ष्मण लोंढे आणि सुबोध जावडेकर यांनी

विज्ञानकथा सादर केल्या. यानंतर श्रोत्यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना श्री. लोंढे यांनी वरील अपेक्षा व्यक्त केली. डॉ. फोंडके आणि श्री. लोंढे यांच्या कथा सध्या चर्चेत असलेल्या क्लोनिंग या विषयावरच होत्या. त्याला उपस्थितांकडून प्रतिसाद मिळाला. तिसरी 'पोलिस' ही कथा सुबोध जावडेकर यांनी सादर केली.

**'साहित्यातील स्त्रीच्या आवाजात पुरुषाचाही आवाज मिसळावा'**

अनेक वर्षांनी स्त्रीला साहित्यातून तिचा आवाज सापडला आहे, यात पुरुषाचा आवाज मिसळावा आणि अनुभवाचे द्वंद्वगीत गायले जावे, मात्र तिने स्वत:चे सत्त्वही जपावे, अशी अपेक्षा नामवंत समीक्षक विजया राज्याध्यक्ष व्यक्त केली.

गदिमा प्रतिष्ठानचा 'गृहिणी, सखी, सचिव पुरस्कार' बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते स्वीकारल्यावर त्या बोलत होत्या.

चैत्रबन पुरस्काराच्या मानकरी अरुणा ढेरे यांनी, 'या सन्मानामुळे आपली नाळ साहित्यातील मोठ्या माणसाशी जोडली गेली याचा आनंद झाला' असे सांगितले. 'आमच्या पिढीचे बालपण गदिमांमुळे सुंदर झाले, परंपरेचा सूक्ष्म संस्कार त्यांच्या गीतात आढळतो' असे त्यांनी नमूद केले.

गदिमा पुरस्कार मिळालेले कादंबरीकार शिवाजी सावंत म्हणाले : गीतकार म्हणून आपण ओळखले जातो, कवी म्हणून नव्हे याची ग. दि. माडगूळकर यांना खंत होती; परंतु कवी म्हणून त्यांनी फक्त गीतरामायण रचले असते तरी ते तेव्हढेच मोठे झाले असते! या एका काव्यात त्यांनी वेदांत सांगितला, असा चमत्कार कोणी करू शकेल का, असे सावंत म्हणाले. अध्यक्षीय भाषणात पुरंदरे म्हणाले की, पुरस्कारामुळे चांगले साहित्य निर्माण होते असे नाही. तर ते ईश्वराचे देणे आहे. मात्र श्रीशिवायन माडगुळकरांच्या हातून माझ्या झोळीत पडले नाही याची खंत वाटते!

**धर्माच्या नावाने झालेल्या अनैसर्गिक फाळणीतच**

**आजच्या दहशतवादाची बीजे- मुझफ्फर हुसैन**

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित **'द अदर साईड ऑफ सायलेन्स'** या उर्वशी बुटालियालिखित पुस्तकाच्या मराठी अनुवादाचे प्रकाशन प्रसिद्ध पत्रकार मुझफ्फर हुसैन यांच्या हस्ते झाले. स्त्रियांच्या समान हक्कांसाठी लढा देणाऱ्या भारतातील 'काली' या ख्यातनाम स्त्रीवादी प्रकाशनगृहाच्या श्रीमती उर्वशी बुटालिया या सहसंपादिका आहेत. अध्यक्षपदी निवृत्त मेजर जनरल शशिकांत पित्रे हे होते.

या प्रसंगी बोलताना मुझफ्फर हुसैन म्हणाले, ''काश्मीर, खलिस्तान, वारंवार उसळणाऱ्या जातीय दंगली, दहशतवाद या आज भारतासमोर असलेल्या समस्यांचा उगम फाळणीमध्ये आहे. जगात अनेक देशांचे विभाजन झाले, परंतु भारताचे विभाजन हे अनैसर्गिक होते. धर्माच्या नावावर झालेल्या विभाजनामुळे हिंदू-मुस्लीमांमधे एकमेकांविषयी तिरस्काराची व द्वेषाची भावना दृढ झाली.'' 'द अदर साईड ऑफ सायलेन्स' या पुस्तकाचा गौरव करून ते म्हणाले,'' उर्वशी बुटालिया यांनी १० वर्षे सतत शोध घेऊन फाळणीचे चित्र या पुस्तकात उभे केले आहे; हे फक्त लेखन नाही तर फाळणीच्या इतिहासाचा दस्तऐवज आहे. तो कोणीही नाकारू शकत नाही. म्हणूनच फाळणीतून उदभवलेल्या असह्य मौनाचे



चित्रण करणारे हे पुस्तक आजच्या दहशतवादाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येकाने अभ्यासावे.' या पुस्तकाचा अनुवाद मराठीत सादर केल्याबद्दल हुसैन यांनी मेहता प्रकाशनाची प्रशंसा केली.

अध्यक्षीय भाषणात श्री. पित्रे म्हणाले,'दहशतवादाचे मूळ कारण धर्मांधता हे आहे. धर्म देवघराबाहेर आला की माणसांची दुरावस्था होते. हिंदू व शीख हे धर्म एकमेकात पूर्णपणे मिसळलेले असूनही दिल्लीत शिखांची कत्तल होते; याचे कारण शोधणे गरजेचे आहे. म्हणूनच 'द अदर साईड ऑफ सायलेन्स' हे पुस्तक आज महत्त्वाचे ठरले आहे.''

पुस्तकाचे अनुवादक श्री. नारायण आवटी यांनी आजच्या पिढीला फाळणी म्हणजे काय हे माहीत होणे आवश्यक आहे, असे मत मांडले.




*डावीकडून शशिकांत पित्रे, नारायण आवटी, मुजफ्फर हुसैन, सुनील मेहता*


**डॉ.सुनीती देशपांडे यांच्या 'फुलांचे बोल' चे प्रकाशन**

रशियन कल्चरल सेंटरच्या वतीने डॉ. सुनीती देशपांडे यांच्या 'फुलांचे बोल' चे प्रकाशन नुकतेच वरळी येथील रशियन कल्चरल सेंटरच्या सभागृहात पार पडले. रशियन भाषेतील या सुंदर कथांचा अत्यंत रसाळ अनुवाद डॉ.सुनीती देशपांडे यांनी मराठी भाषेत सादर केला आहे. हे पुस्तक मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केले आहे. समारंभाचे अध्यक्ष प्रसिद्ध पत्रकार श्री. संजय राउत हे होते. अशा प्रकारच्या साहित्यिक देवाणघेवाणीमुळे रशिया व भारत यांचे संबंध सांस्कृतिकदृष्ट्या अधिक बळकट होतील असे मत त्यांनी व्यक्त केले. या पुस्तकाची त्यांनी प्रशंसा केली. याप्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित होते.

**अभिनंदन!**

आमचे तरूण लेखक राजन गवस याच्या साहित्यकृतीला साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल यंचे मन:पूर्वक अभिनंदन.

# आमच्या खास,चौकस वाचकांसाठी..




## ब्रिटानिका प्रश्नमंजूषा


**खंड १ ते ४**

**ब्रिटानिकाचे हे खंड घ्या व आपले ज्ञानभांडार वाढवा... खूप शिका.**

**४ खंडांची किंमत पोस्टेजसह ४४० रु.भरा आणि १८० रुपयांची ऑक्सफर्ड इंग्रजी-मराठी डिक्शनरी भेट मिळवा.**

**रक्कम मनीऑर्डर/ड्राफ्ट द्वारा पाठवा.**


**योजना संच उपलब्ध असेपर्यंत!**




**मुदत ३१ जानेवारी २००२ पर्यंतच!**

**मेहता पब्लिशिंग हाऊस,** १२१६, सदाशिव पेठ, मुलांच्या भावे हायस्कूलजवळ, पुणे- ३०.
फोन : ४४७६९२४ **Email - mehpubl@vsnl.com**






*वल्लरी करमरकर पुरस्कार स्वीकारताना (डावीकडून) श्री. अरुण ओगले, वल्लरी करमरकर व तिचे वडील, सुनील मेहता व आनंद यादव*

**मेहता पब्लिशिंग फाऊंडेशन पुणे, पुरस्कृत**
**श्रीमती कमलाबाई ओगले पुरस्कार प्रदान समारंभ**

मेहता पब्लिशिंग फाऊंडेशन पुणे, पुरस्कृत श्रीमती कमलाबाई ओगले पुरस्कार प्रदान समारंभ दि. ६ डिसेंबर, २००१ रोजी मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स मधील पद्मजी हॉलमध्ये संपन्न झाला.

लेखन व शिक्षण या दोन क्षेत्रात कामगिरी करणाऱ्या दोन कर्तबगार महिलांना या फाऊंडेशनतर्फे पुरस्कार यंदापासून देण्यात येणार आहेत. अपंगत्वावर जिद्दीने मात करून एम. ए. पर्यंत शिक्षण घेणाऱ्या सांगली येथील कु. वल्लरी करमरकर यांना यंदाचा पुरस्कार फाऊन्डेशनचे अध्यक्ष डॉ. आनंद यादव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. रोख पाच हजार रुपये, शाल, श्रीफल व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

लेखनासाठी दिला जाणारा पुरस्कार लेखिका आशा बगे यांना डॉ. आनंद यादव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. (रोख दहा हजार रुपये, शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह) श्री. अनिल मेहता, श्रीमती कमलाबाई ओगले यांचे पुत्र अरुण ओगले व कन्या उषाताई नांदुरकर आदि यावेळी उपस्थित होते. पुरस्कार वितरण सोहळ्यात आशा बगे यांच्या 'ऋतुवेगळे' या पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तीचे प्रकाशन डॉ. आनंद यादव यांच्या हस्ते झाले.

वल्लरीने आपल्या जीवनाचा आलेख उपस्थितांसमोर मांडला अन् सर्वांचीच मने हेलावली.

या वेळी बोलताना ती म्हणाली की, पुणे हे विद्येचे माहेरघर आहे. माझी आईही पुण्याची असल्यामुळे तिच्या माहेरघरात हा पुरस्कार मिळतो, हे पाहून खूप आनंद झाला. बी. ए. उत्तीर्ण झाल्यावर आईने एम. ए. कर, असे सांगितले. माझ्या आई-वडिलांबरोबरच आत्याचा मोठा वाटा आहे. आई वडिलांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे अनंत अडचणीवर मात करून एम. ए. पर्यंत शिक्षण घेतले. तसेच सांगलीकरांनी दिलेल्या प्रेमाचाही तिने आवर्जून उल्लेख केला.

श्रीमती आशा बगे आपल्या भाषणात म्हणाल्या की, माझी पाऊलवाट तयार होती, ज्येष्ठ साहित्यिकांचे लेखन वाचत असताना ते माझ्या मनाला भावले. सूक्ष्मरीत्या वाचन करून मी माझी वाट शोधली. मला कधी कधी प्रश्न पडतो की, मी का लिहिते? कमल देसाई, विजया राजाध्यक्ष, पर्लबक यांचे साहित्य वाचून आपणही लेखन करावे अशी प्रेरणा मला झाली.

फाऊन्डेशनचे अध्यक्ष डॉ. आनंद यादव म्हणाले की, वल्लरीच्या रुपाने मानवी जिद्द काय असते, याची प्रचीती या कार्यक्रमामुळे अनुभवता आली. मध्यमवर्गीय कुटुंबातील स्त्री-मनाच्या गुंतागुंतीचे चित्रण बगे यांच्या लेखनातून पहायला मिळते.

अनिल मेहता यांनी प्रास्ताविक केले, तर सुनील मेहता यांनी आभार मानले.

## दमाणी पुरस्कारांचे वितरण

मराठी साहित्य क्षेत्रात मानाचा व प्रतिष्ठेचा समजला जाणारा भैरुरतन दमाणी साहित्य पुरस्कार सोलापूर येथील हुतात्मा स्मृती मंदिरात दि. १६ डिसेंबरला प्रदान करण्यात आला. अध्यक्षस्थानी हिंदी साहित्यिक डॉ. भगवानदास तिवारी होते.

पंधरा हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ व पुष्पहार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. बालकोडे (ह.मो.मराठे),सांध्यमग्न पुरुषाची लक्षणे (ग्रेस), संस्कृतीच्या पाऊलखुणा (द.ता. भोसले) या पुस्तकांना हे पुरस्कार लाभले.

सन्मानाचा दमाणी साहित्य पुरस्कार मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त करून ह. मो. मराठे म्हणाले की, आपल्या ५ ते १२ वर्षे वयोगटातील बालपणाची कौटुंबिक गोष्ट आपल्या 'बालकाण्ड' या आत्मकहाणीतून आपण साकार केली आहे. ही केवळ गोष्टच नव्हे तर एक उत्तम साहित्यकृती आहे, असे ते म्हणाले. यावेळी कवी ग्रेस यांनी आपल्या धीरगंभीर भाषणात शेरशायरी व काव्यपंक्ती सादर करीत समाजातील अपप्रवृत्तीवर हल्ला चढविला.

जातीभेद, वर्णभेद अशा विकृती समाजात फोफावत असतानाच पाश्चात्य संस्कृतीचे आंधळे अनुकरण करण्याकडे लोकांचा कल वाढत आहे. यामुळेच विविध समस्या उद्भवत आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. द. ता. भोसले यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. म. द. हातकणगंलेकर म्हणाले की, स्वातंत्र्योत्तर काळात साहित्य क्षेत्रात आमूलाग्र बदल झाले आहेत व होत आहेत. शिक्षणाच्या प्रसारामुळे साहित्याचे विकेंद्रीकरण झाले आहे. जवळपास सर्वच ठिकाणी साहित्य परिषदांचे कामकाज जोमाने सुरू आहे. यातून नव्या उमेदीचे साहित्यिक निर्माण होत आहेत. यामुळे समाजातील सर्व स्तरांना स्पर्श केला जात आहे. साहित्यिकांना प्रेरणा देण्यासाठी शासन पुरस्कार देतेच पण विविध संस्था आणि प्रतिष्ठानेही असे पुरस्कार देऊन साहित्य समृद्ध करण्यास हातभार लावत आहेत. त्यात दमाणी बंधूंचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

नाट्य, कला, साहित्य क्षेत्रात सोलापूर हे 'मिनी इंडिया' असल्याचा उल्लेख करून डॉ. भगवानदास तिवारी म्हणाले की, दमाणी साहित्य पुरस्कार हा नव्या पिढीचे प्रेरणस्रोत आहे. साहित्याची साधना करणे म्हणजे उपासना करणे होय. केवळ पुरस्कारासाठी साहित्य न लिहिता



त्यातून समाजातील वास्तवतेचे दर्शन घडवून उत्कृष्ट साहित्य निर्मितीचा प्रयत्न केला जावा, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

सूत्रसंचालन पत्रकार विवेक घळसासी यांनी केले. त्यांनी विविधरंगी सोलापूरची ओळख करून दिली. आभार प्रदर्शन पुरस्कार निवड समितीचे सदस्य आ. रामदास फुटाणे यांनी केले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने स्मृती मंदिराचे सभागृह साहित्यप्रेमींनी खचाखच भरले होते. यावेळी लोकमतच्या 'अक्षररंग' पुरवणीचे संपादक शंकर सारडा, डॉ. त्र्यं. वि. सरदेशमुख, प्रा. श्रीराम पुजारी, डॉ. गो. मा. पवार, अशोक नायगावकर, नारायण सुंमत, भगवान देशमुख, प्रकाश पठारे, फ. मुं. शिंदे, नितीन केळकर, प्रशांत मोरे, मृणाल कानेटकर, अंजली कुलकर्णी, पुरस्कार निवड समितीचे सदस्य लक्ष्मीनारायण बोल्ली, दत्त हलसगीकर, वसंतराव एकबोटे, सुविद्या प्रकाशनचे बाबुराव मैदर्गीकर, जिल्हाधिकारी बी. व्ही. गोपालरेड्डी, तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते. नंतर नामवंत कवींचा 'हास्यधारा' कार्यक्रम झाला.

## साहित्यप्रेमी भगिनी मंडळांचे साहित्य पुरस्कार जाहीर

पुण्यातील साहित्यप्रेमी भगिनी मंडळातर्फे देण्यात येणारे साहित्य पुरस्कार जाहीर झाले आहेत. कादंबरी लेखनासाठीचा, 'मालतीबाई दांडेकर पुरस्कार' ज्योत्स्ना देवधर यांना, तर ललित लेखनासाठीचा, 'सुधा जोशी पुरस्कार' शोभा चित्रे यांना 'गौरी गौरी आलीस कुठं?' या पुस्तकाकरिता मिळाला आहे. बालकथा आणि बालकवितांसाठी देण्यात येणारा 'इंदिरा गोविंद कुलकर्णी पुरस्कार', प्रतिमा इंगोले यांच्या 'लाजाळू' कवितासंग्रहाला व स्मिता राजवाडे यांच्या 'गुणगुण गाणी' या कवितासंग्रहास विभागून मिळाला आहे.

कथेसाठी डॉ. मंदा खांडगे (दोडी) व चित्रा वझे (अपराजिता) यांची निवड करण्यात आली आहे. या पुरस्कारांसाठी परीक्षक म्हणून डॉ. पुंडे, डॉ. अंजली सोमण, डॉ. संगीता बर्वे, स्वाती कर्वे, दत्ता टोळ, वर्षा प्रभू, रवींद्र भट, प्रा. आरती दातार यांनी काम पाहिले.

## डॉ. रामचंद्र देखणे यांना संत रामदास पुरस्कार

सांगली जिल्हा नगर वाचनालयाच्या वतीने देण्यात येणाऱ्या 'संत रामदास पुरस्कारा'साठी या वर्षी संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे यांची निवड करण्यात आली. संतसाहित्याचे संशोधन व लेखन करणाऱ्या व्यासंगी व्यक्तीस दर वर्षी हा पुरस्कार देण्यात येतो.

डॉ. देखणे यांनी संतसाहित्य व लोकसाहित्यावर आतापर्यंत अठरा पुस्तके लिहिली आहेत. व्याख्याने, प्रवचन व भारुडाद्वारेही त्यांचे संतविचारांच्या प्रसाराचे कार्य चालू आहे.

## भालचंद्र नेमाडे यांना 'महाराष्ट्र फाउंडेशन गौरव पुरस्कार'

महाराष्ट्र फाउंडेशनतर्फे देण्यात येणाऱ्या दोन लाखाच्या गौरव पुरस्कारासाठी यंदा ज्येष्ठ कादंबरीकार भालचंद्र नेमाडे यांची निवड झाली. लोकसाहित्याच्या क्षेत्रातील लक्षणीय कामगिरीबद्दल अभ्यासक गंगाधर मोरजे यांना विशेष पुरस्कार (५० हजार) देण्यात आला.

वैचारिक मराठी नियतकालिकासाठीचा पुरस्कार 'बायजा'ला मिळाला आहे, श्रीमती सौदामिनी राव त्याच्या संपादिका आहेत. (पन्नास हजार रुपये)

याबरोबरच श्रीनिवास कुलकर्णी यांच्या 'कोरडी भिक्षा', ना. धों. महानोर यांच्या 'तिची कहाणी', राम दातोंडे यांच्या 'गल्ली बदललेला मोर्चा', दीनानाथ महानोर यांच्या 'मन्वंतर', मुरलीधर पवार यांच्या 'मार्क्सचा मानव विचार' व जयप्रकाश सावंत यांनी अनुवादित केलेल्या

‘तिरिक्ष आणि इतर कथा’ या पुस्तकांना प्रत्येकी २५ हजार रुपये पुरस्कार मिळाले.

तीस डिसेंबरला बालगंधर्व रंगमंदिरात ज्येष्ठ विचारवंत प्रा. ग. प्र. प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली गीतकार जावेद अख्तर यांच्या उपस्थितीत पुरस्कार देण्यात आले. भारतीय निवड समितीच्या अध्यक्षपदी मृणाल गोरे असून, प्रा. दिगंबर पाध्ये, नारायण सुर्वे, डॉ. विजया राजाध्यक्ष, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, प्रा. वसंत डहाके, सतीश काळसेकर, डॉ. सुधीर पानसे व वामन केंद्रे यांचा त्यात समावेश आहे. सुनील देशमुख अमेरिकेतील परीक्षक समितीचे निमंत्रक असून, दिलीप चित्रे, राजन गडकरी, विद्युल्लेखा अकलूजकर, डॉ. ललिता गंडगंभीर, संध्या कर्णिक यांचा त्यात समावेश आहे. अमेरिकेतील मराठी नागरिकांतर्फे गेल्या आठ वर्षांपासून दर वर्षी केशवराव गोरे स्मारक ट्रस्टच्या मदतीने साहित्य पुरस्कार देण्यात येतात.

**आंतरराष्ट्रीय नभोनाट्यलेखन स्पर्धेत डॉ. एडल यांच्या नाटकाला उत्तेजनार्थ पारितोषिक**

‘बी. बी. सी. वर्ल्ड सर्व्हिस’ आणि ‘ब्रिटिश कौन्सिल’ यांनी आयोजित केलेल्या या वर्षीच्या आंतरराष्ट्रीय नभोनाट्य लेखनस्पर्धेमध्ये, पुण्याच्या डॉ. एन. सी. एडल यांच्या ‘द फिलॉन्थ्रॉपिस्ट’ या नभोनाट्याला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले आहे. डॉ. एडल यांनी लिहिलेले हे पहिलेच नाटक आहे.

एम. बी. बी. एस. आणि एम. डी. या दोन्ही परीक्षांमध्ये सुवर्णपदक पटकावलेले डॉ. एडल सध्या पुण्याच्या रुबी हॉल क्लिनिकमध्ये कार्यरत आहेत. आरोग्य, प्रवासवर्णन, कथा अशा स्वरूपाचे त्यांचे लेखन वेळोवेळी ‘साप्ताहिक सकाळ’मध्ये प्रकाशित झालेले आहे.

या वर्षी ‘एशियन एज’ने घेतलेल्या लघुकथा स्पर्धेत आणि गेल्या वर्षीच्या बी. बी. सी. ने आयोजित केलेल्या लघुकथा स्पर्धेतही त्यांना प्रथम पारितोषिक मिळाले होते.

**राजन गवस यांना यंदाचा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त**

साहित्य अकादमीचा २००१ या वर्षाचा मराठीतील उत्कृष्ट साहित्य निर्मितीचा पुरस्कार राजन गवस यांच्या ‘तणकट’ या कादंबरीला देण्यात आला. बावीस भारतीय भाषांतील उत्कृष्ट साहित्य निर्मितीसाठी हे पुरस्कार देण्यात आले.

‘सामान्य माणसाची जगण्याची धडपड, त्यांच्यात गुंतून जाण्याची संधी,त्यातून येणारी अस्वस्थता हीच माझ्या लेखनामागची प्रेरणा आहे,’ अशी प्रतिक्रिया राजन गवस यांनी व्यक्त केली.


इंग्रजीमधील पुरस्कार राजमोहन गांधी यांच्या ‘राजाजी अ लाईफ’ला,हिंदीतील अलका सरोगी यांच्या ‘काली कथा’ला, कोकणीतील माधव बोरकर यांच्या ‘यमन’ला व संस्कृतमधील पी. श्रीरामचंद्ररुडू यांच्या ‘काव्यरस’ला जाहीर करण्यात आला. मानपत्र व पंचवीस हजार रोख असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

**‘रसिक साहित्य’चा कुशल ग्रंथविक्रेते म्हणून गौरव**

फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्सच्या वतीने पुण्याच्या ‘रसिक साहित्य’चा कुशल ग्रंथविक्रेते म्हणून नुकताच गौरव करण्यात आला. फेडरेशनचे उपाध्यक्ष आनंदभूषण यांच्या हस्ते दिल्लीत हा समारंभ झाला. रसिक साहित्यच्या वतीने मोरेश्वर नांदुरकर यांनी गौरव स्वीकारला. पंचधातूची सरस्वतीची मूर्ती व सन्मानपत्र असे त्याचे स्वरूप आहे.



## या महिन्यातील काही ‘खास’ पुस्तकांची झलक...




# विद्रोही

ओशो

**अनुवाद- माधुरी काबरे**


*हा ‘विद्रोही’ म्हणजे एक असा माणूस आहे, की त्यानं जराजर्जर झालेल्या भूतकाळाच्या शृंखलांमधून स्वतःला मुक्त केलेलं आहे. एका संपूर्ण नव्या मार्गाशी आता तो संबद्ध आहे. हा नवा माणूस आपले विचार कृतीत आणण्याइतका धैर्यवान आहे. ओशोंचा मार्ग हा नव्या विद्रोहाचा मार्ग आहे. काय करा हे अजिबात न सांगता ते आपल्याला प्रेरणा देत आहेत. आपल्यामध्येच सदैव वसत असलेल्या मार्गाकडे ते निर्देश करत आहेत. उदाहरणार्थ, जेव्हा ते क्रांतीबद्दल बोलतात, तेव्हा ती नेहमी आतलीच क्रांती असते. बाहेरची क्रांती राजकीय क्रांती, म्हणजे व्यर्थ माथेफोड आहे.*

*‘विद्रोही’ हे पुस्तक वाचण्यासाठी एक विशिष्ट प्रकारची पूर्वग्रहरहित अशी लक्षपूर्वकता पाहिजे. यापैकी बहुतेक गोष्टी सुरुवातीला इतक्या वादग्रस्त वाटतील आणि जर का तुम्हाला आपलं मन मोडता आलं नाही, तर तुम्हांला सतत मनाशी भांडावं लागेल. खुल्या अंतःकरणानं हे पुस्तक जर का तुम्ही वाचलंत; या आश्चर्यकारकरीत्या साध्या शिकवणुकीचा अर्थ लक्षात घेतलात, तर तुमच्या अपेक्षेबाहेर तुमच्या जीवनपद्धतीत परिवर्तन झाल्याशिवाय राहणार नाही. चैतन्याच्या प्रदेशातलं हे एक थोर साहस आहे. स्वैर अज्ञातात ही एक भटकंती आहे.*

**किंमत ; १२० रु. सवलतीत : ९६ रु. सभासदांना : ९० रु.**

# टोकियोच्या नभांगणातील चमकत्या तारका

**मूळ लेखिका : फिलिस् बार्नबॉम अनु.: सुधा नरवणे**




*परंपराबद्ध जपानी समाजात वादळे उठवणाऱ्या या पाची जणी आयुष्यात यशस्वी झाल्या असे नव्हे, तथापि आपल्या वर्तनाने त्यांनी कळत नकळत, रुढीप्रेमी जपानी समाजाला धक्के दिले आणि परिवर्तनाची बीजे पेरली. त्यास्त्रियांना कल्पनाही नव्हती, की आपण एक प्रकारे क्रांती घडवून आणीत आहोत. आपले ईप्सित साध्य करण्यासाठी एखाद्या व्यक्तीला कशाकशाला तोंड द्यावे लागते, कोणता त्याग करावा लागतो, अखेर हाती काय लागते, हे प्रश्न उभे राहतात.*

**किंमत ; १८० रु. सवलतीत : १४४ रु. सभासदांना : १३५ रु.**

# श्रद्धांजली

## ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ सदाशिव आठवले यांचे निधन

ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ आणि साहित्यिक प्राचार्य सदाशिव आठवले (वय ७९ वर्षे) यांचे दि. ८ डिसेंबरला वृद्धापकाळाने निधन झाले.

प्राचार्य आठवले यांचा जन्म तीन मार्च १९२३ रोजी अलिबागजवळील सातघर या खेड्यात झाला होता. शालेय शिक्षणानंतर मुंबई विद्यापीठातून त्यांनी एम. ए. ही पदवी संपादन केली होती. त्यानंतर १९४६ मध्ये पुण्याच्या स. प. महाविद्यालयात त्यांनी प्राध्यापक म्हणून कामास प्रारंभ केला. कोल्हापूरचे राजाराम कॉलेज आणि मुंबईच्या एलफिन्स्टन महाविद्यालयातही त्यांनी इतिहास आणि राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम पाहिले. सोळा वर्षे प्राध्यापक म्हणून काम केल्यानंतर मराठी विश्वकोशाच्या निर्मिती कार्यात ते सहभागी झाले होते. विश्वकोशाच्या संपादन मंडळात वरिष्ठ संपादक म्हणून त्यांनी आठ वर्षे काम पाहिले. विश्वकोश निर्मितीच्या कामानंतर १९७० मध्ये त्यांनी कुर्डुवाडी येथील महाविद्यालय; तसेच नगरच्या सारडा महाविद्यालयाचे प्राचार्यपदही भूषविले.

राज्यशास्त्र, इतिहास या विषयांवर त्यांनी मराठी आणि इंग्रजीतून लेखन केले.

ललित लेखनामध्ये बारा कथासंग्रहांचा समावेश असून, राज्यशास्त्रावरही त्यांची 'लोकशाहीचा कारभार' आणि 'लोकमत' ही पुस्तके प्रसिद्ध आहेत.

इतिहासावरही त्यांची तेवीस पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. त्यामध्ये चार्वाक, इतिहासाचे तत्त्वज्ञान, शिवाजी आणि शिवयुग, मराठी सत्तेचा विकास आणि ऱ्हास, नाना फडणीस आणि इंग्रज, रामशास्त्री, सरदार बापू गोखले, उमाजी राजे मुक्काम डोंगर, दारा शुको, केमाल पाशा, आधुनिक जग, अर्वाचीन युरोप, हिंगणे दप्तर, शिंदेशाही इतिहासाची साधने, जॉर्ज वॉशिंग्टन, जगद्गुरू इब्राहिम आदिलशाह, रामायण, महाभारत, ऐका भाऊबंदांनो तुमची कहाणी, तुळशीबागवाले दप्तर, विजयनगरचा सम्राट कृष्णदेवराय, कृष्ण, बुंदेलखंडाचा महाराज छत्रसाल यांचा समावेश आहे. याच विषयांवर त्यांनी इंग्रजीतून पंचवीस शोधनिबंधही लिहिले होते. चार्वाक, इतिहासाचे तत्त्वज्ञान व सरदार बापू गोखले या तीन पुस्तकांना राज्य सरकारचा पुरस्कार मिळाला होता. सरदार गोखले यांच्यावरील पुस्तकाला केसरी मराठा संस्थेनेही पुरस्कार देऊन गौरविले होते.

## साने गुरुजींचे वारस– रा. वा. शेवडे

काही दिवसांपूर्वी भा. रा. भागवत यांचे निधन झाले. त्या आधी गोपीनाथ तळवलकर काळाच्या पडद्याआड गेले. मुलांसाठी सकस, संस्कारक्षम आणि त्यांच्या अवखळ खोडकरपणाला दिशा देणारे विविधांगी साहित्य लिहिणारे बालसाहित्याच्या क्षेत्रातील हे बिनीचे मोहरे कोसळल्यानंतर, याच मालिकेतील कोल्हापूरचे रा. वा. शेवडे गुरुजी गेले. मुलांसाठी अखंड पन्नास वर्षे लेखन करणाऱ्या व्रतस्थांची परंपरा शेवडे गुरुजींच्या जाण्याने खंडित झाली आहे. 'करी मनोरंजन जो मुलांचे, जडेल नाते प्रभुशी तयाचे' हा वसा घेऊन शेवडे गुरुजींनी उदंड लेखन केले. उत्तमोत्तम चरित्रांनी मुलांचा पिंड पोसला जावा, या तळमळीपोटी त्यांनी मीराबाई, नानक, महर्षी दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद, महाराणी ताराबाई, रणरागिणी दुर्गाराणी, मादाम मॉंटेसरी, मदर तेरेसा इत्यादी सदतीस चरित्रे लिहिली. 'पिंपळवाडीचा पिऱ्या', 'मंगल', 'लाडका भक्त', 'शांतिदूत', 'दौलत', 'अज्ञात ठिकाणी', 'दिव्यत्वाची दिली प्रचिती' अशा बालकादंबरिका, सत्तेचाळीस बालकथासंग्रह, पाच बालनाट्ये, कवितासंग्रह आणि इतरही विविध विषयांवरील लेखन शेवडे गुरुजींच्या खात्यावर जमा आहे. त्यांच्या साध्या, सोप्या आणि रसाळ गोष्टीरूप लेखनाने सलग तीन पिढ्यांना खिळवून ठेवले. गुरुजींचे हे साहित्य पुन:पुन्हा वाचणारे आणि दर वेळी त्यातून नवनवी अनुभूती-स्फूर्ती घेणारे अनेक जण आहेत. त्यांच्याशी निकटचे नाते जोडलेले शेवडे गुरुजी आता नसले, तरी पुस्तकांच्या रूपात उरलेले त्यांचे अस्तित्व दीर्घकाळ मुलांना संस्कारांची शिदोरी देत राहील.

बालसाहित्याच्या कक्षा अलीकडे रुंदावत आहेत, ही समाधानाची गोष्ट असली, तरी अजूनही स्वतंत्र अभ्यास, वेगळी मांडणी अभावाने आढळते. ज्यूल व्हर्न या लेखकाने विज्ञानावर आधारित अनेक कादंबऱ्या लिहिल्या. त्या वेळच्या उपलब्ध शास्त्रीय ज्ञानाच्या व्यासंगामुळे त्याने काळ आणि स्थळ यांच्या सीमा ओलांडून लेखन केले. त्याने पाहिलेल्या स्वप्नांना साकार करण्यासाठी जगभरातील संशोधकांनी अथक प्रयत्न केले. ज्यूल व्हर्नसारखी उदाहरणे आपल्याकडे किती आहेत? उत्तम बालकथा जागतिक वाङ्मयाचा भाग बनू शकते, हे 'ॲलिस इन वंडरलँड', 'ट्रेझर आयलँड' इत्यादी कथांनी सिद्ध केले आहे. अशी उदाहरणे आपण किती सांगू शकू? एका बाजूने असे चित्र असताना, लहान मुलांसाठी लिहिणाऱ्यांकडे पाहण्याचा आपल्या समीक्षकांचा दृष्टिकोन तरी निकोप, निर्मळ कोठे आहे? त्यामुळे या साहित्यकारांना विशेष मानमरातब मिळत नाही; किंबहुना अनेकदा बालसाहित्यिक म्हणून त्यांची कुचेष्टाही होते. त्यामुळे बालसाहित्यकारांमध्येही न्यूनगंडाची भावना मूळ धरून बसलेली दिसते. आपल्या लेखनाबद्दलचा अभिमान ते सहसा प्रकट करीतच नाहीत. 'छोट्या मुलांसाठी लिहिलेले काही तरी' अशी संभावनाही बालसाहित्याच्या वाट्याला आली; मात्र साने गुरुजींसारख्यांनी आपला रस्ता बदलला नाही. मुलांसाठीच्या साहित्यात मराठीत विविधांगी लेखन विपुल असले, तरी मुलांच्या भावभावनांशी, स्वप्नांशी, ध्येयांशी पूर्ण समरस होऊन दीर्घ काळ लिहिणारे हाताच्या बोटांवर मोजण्यासारखेच साहित्यिक आहेत. शेवडे गुरुजी हा या प्रांतातील एक निर्मळ आणि अखंड वाहणारा झरा होता.

नव्या पिढीला चांगले वाचायला मिळावे, ही शेवडे गुरुजींची तळमळ होती आणि याच ध्यासाने त्यांनी चाळीस-पंचेचाळीस वर्षांपूर्वी लेखन सुरू केले. त्यांनी प्रदीर्घ काळ अध्यापन तर केलेच; पण त्यापेक्षा किती तरी व्यापक अर्थाने त्यांनी आपले 'गुरुजी'पण सांभाळले. आपण गुरुजी आहोत, याचा त्यांना अभिमान होता. बालशिक्षणासंबंधी त्यांनी मांडलेले विचार त्यांच्या या अभिमानाची प्रचीती देतात. मादाम मारिया मॉंटेसरीतून त्यांनी मॉंटेसरीची पदविका घेतली आणि नूतन बालशिक्षण परिषदेद्वारे बालवाडी शिक्षण आणि त्याचा प्रसार यांत मोलाचे कार्य केले. कोल्हापुरातील बाल-कुमार साहित्य सभेचे ते संस्थापक अध्यक्ष होते; तसेच त्यांनी बाल-कुमार साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही १९९५ मध्ये भूषविले. गेली अडीच-तीन वर्षे वार्धक्यामुळे शेवडे गुरुजींचे फिरणे आणि लिहिणेही थांबले होते; परंतु मुलांसाठी संस्कारक्षम लेखन झाले पाहिजे, त्यात नवनवे प्रयोग सातत्याने होत राहिले पाहिजेत, ही तळमळ त्यांच्या बोलण्यातून व्यक्त होत असे. साने गुरुजींच्या 'धडपडणाऱ्या मुलां'नी शिक्षण क्षेत्रात वेगवेगळे प्रयोग केल्याची अनेक उदाहरणे दिसतात. त्यांच्या या धडपडणाऱ्या मुलांप्रमाणेच काहींनी साने गुरुजींची गोष्टीवेल्हाळ मुले होण्याचा रस्ता धरला आणि त्या वाटेवरून अविचल वाटचाल केली. साने गुरुजींचा साधेपणा, त्यांच्या लेखनामागील ध्यास, अध्यापनातील प्रयोगशीलता, मुलांच्या मनाशी फुलांसारखे कोमल होऊन केलेला संवाद आणि त्यांच्याशी पूर्ण एकरूपत्व साधण्याची अलौकिकता हे सारे शेवडे गुरुजींमध्ये होते. त्यांच्या जाण्याने साने गुरुजींचा सच्चा वारसदार नाहीसा झाला आहे.

(सकाळवरून)

**पुस्तक परिचय**

## हे पुस्तक का वाचावे?

१) आजचे अग्रगण्य विज्ञानकथाकार डॉ. बाळ फोंडके यांच्या ताज्या कथांचा संग्रह.

२) विज्ञान संशोधन क्षेत्रातील वाढत्या व्यापारी स्पर्धेमुळे फोफोवलेल्या अपप्रवृत्तींचे परखड चित्रण करणाऱ्या कथा


३) विज्ञानाच्या नव्या शोधांमुळे 'माणसां'ची मानसिकताच कशी बदलत आहे, हे दाखवण्यावर भर

४) बदलणाऱ्या वास्तवाचे आभासमय रूप हे सुंदर व सुखावह असेल का?

५) विज्ञानविषयक संकल्पनांना रंजक कथानकाचे कोंदण

# व्हर्च्युअल रिॲलिटी

**डॉ. बाळ फोंडके**




***नवे संशोधन, जागतिकीकरण आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धा यांनी ढवळून निघालेल्या मानवी मूल्यांचा वेधक कथात्मक आविष्कार***

डॉ. बाळ फोंडके यांनी विज्ञानविषयक लेखनात स्वत:चे स्थान निर्माण केले आहे. सायन्स टुडे या टाइम्स ऑफ इंडियातर्फे निघणाऱ्या विज्ञान मासिकाचे ते संपादक होते. इकॉनॉमिक टाइम्स व महाराष्ट्र टाइम्स यांच्या संपादकीय विभागातही काही काळ होते. विज्ञानविषयक नवसंशोधनाचा मागोवा घेणारे त्यांचे विपुल लेखन आजवर प्रसिद्ध झालेले आहे. विज्ञानकथांचेही कालवलय, खिडकीलाही डोळे असतात, वगैरे संग्रह त्यांच्या खात्यावर जमा आहेत.

'व्हर्च्युअल रिॲलिटी' हा त्यांच्या बारा विज्ञानकथांचा नवा संग्रह. जागतिकीकरणाची



प्रक्रिया, माहितीतंत्रज्ञान क्षेत्रातील क्रांती, बायोटेक्नॉलॉजी, विविध क्षेत्रांतील संशोधन यामुळे मानवी जीवनात, कुटुंबसंस्थेत व मूल्यव्यवस्थेत बरीच उलथापालथ होत आहे. या उलथापालथीची विविध रूपे डॉ. बाळ फोंडके यांच्या विज्ञानकथांमध्ये वाचकांना बघायला मिळतात. विज्ञानातील संकल्पना कथानकाच्या चौकटीत बसवताना डॉ. फोंडके निवेदनाच्या वेगवेगळ्या शैलींचा अवलंब करतात; रंजकता व ज्ञान यांचाही शक्य तितका मेळ घालून कथेची रंगत वाढवत नेतात आणि शेवटी वाचकाला अंतर्मुख करतात. एखाद्या कळीच्या मुद्याकडे लक्ष वेधून वाचकाला तो सोडवण्यासाठी प्रवृत्त करतात. डॉ. फोंडके विज्ञानाच्या नवीन संशोधनाबाबत जागरुकपणे नोंद घेत, मानवी आयुष्याच्या संदर्भात त्या संशोधनाचा प्रभाव कसा पडू शकेल याचेही आडाखे बांधत असतात. साहजिकच त्यांचे लेखन व चिंतन केवळ कल्पनारंजनाच्या पातळीवर रेंगाळत नाही. ते अधिक विश्वासार्ह वास्तवाच्या पातळीवर असल्याचे आढळते.

'व्हर्च्युअल रिॲलिटी' या संग्रहाच्या मनोगतात ते एक विचार विशेष आग्रहपूर्वक मांडतात. "गेल्या शतकाच्या उत्तरार्धात जैवतंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान यांची घोडदौड सुरू झाली. तेव्हा या तंत्रज्ञानाच्या उत्पादनांनी राहत्या घराचे उंबरठे ओलांडून माजघरातच नव्हे तर शेजघरातही प्रवेश केला. माणसाच्या व्यक्तिगत आयुष्यात, अगदी खाजगी मानल्या जाणाऱ्या दालनामध्येही घुसखोरी आरंभली. त्यापोटी व्यक्ति-व्यक्तींची आयुष्यं तर ढवळून निघालीच, पण नीति-मूल्यांची चौकटच विस्कटू लागली. जागतिकीकरणाच्या अनावर ओढीनं तर जीवनकलहाला जीवघेण्या स्पर्धेचं परिमाण प्राप्त करून दिलं... या सर्वांची परिणती दुसऱ्यावर अनिर्बंध स्वामित्व स्थापन करण्याच्या इर्षेला अधिक इंधन पुरवण्यात झाली नसती तरच नवल!... सत्य, शिव, सुंदर यांची हकालपट्टी होऊन त्यांची जागा सत्ता, सत्ता आणि सत्ता हिनं घेतली. इतरांवर बेलगाम स्वामित्व गाजवण्याची प्रवृत्ती भलेही हिणकस वाटो, ती प्रत्येक सजीवाची उपजत प्रवृत्ती आहे, असा दावा द सेल्फिश जीन या सिद्धान्ताद्वारे रिचर्ड डॉकिन्सने केला आहे. आनुवंशिक गुणधर्मांचा आराखडा ज्यात समाविष्ट आहे अशा जनुकाचीच ती प्रवृत्ती असल्याने तीच आता सर्व सजीवांची आणि पर्यायानं माणसाचीही मूलभूत प्रेरणा व्हावी हे मग ओघानेच आले. विज्ञानाने राजकारण, राजनीती, जागतिक अर्थकारण, व्यापारी संघर्ष, यांच्याबरोबर हातमिळवणी केल्यावर या मंथनातून केवळ हलाहलच वर येऊ लागले." याचं प्रतिबिंब विज्ञानकथांतून पडणं स्वाभाविक आहे.

डॉ. बाळ फोंडके अशा या व्यापक परिप्रेक्ष्यातून विज्ञानकथेकडे आणि एकूण आजच्या मानवी अस्तित्वाकडे पाहतात. विद्रूप वास्तवाचे भेदक चित्रण करणाऱ्या विज्ञानकथा म्हणजे त्यांना साहित्याच्या मूलप्रवाहाशी नाळ जुळलेल्या वास्तव कथाच वाटतात. हे वास्तव कदाचित या क्षणाचं नसलं तर उद्याचं नक्कीच आहे असे ते मानतात. मात्र हे उद्याचं वास्तव आज थोडं फार धूसर आहे, आभासात्मक आहे. म्हणून त्याला व्हर्च्युअल रिॲलिटी असं आपण मानतो. व्हर्च्युअलचा अर्थ मिथ्य, आभासी असा घेता येतो तसाच जवळजवळ व निकटचा असाही घेता येतो. आभासी वास्तवाचा फेरफटका केला तरच त्या वास्तवात टिकून राहण्याचे उपाय शोधणे शक्य होईल– हाही विचार या कथांच्या निर्मितीमागे आहे असे ते मानतात.

**गांधारीचे पुत्र**

महाभारतातील गांधारी उभे वैवाहिक आयुष्य डोक्यांवर पट्टी बांधून काढते. शंभर पुत्रांची

माता म्हणून जगते. आधुनिक काळातील गांधारीचेही शंभर पुत्र देशात इकडेतिकडे वाढत असतात. ते दिसायला सारखे असतात, त्यांच्या लकबी सारख्या असतात; पण मानसिक बौद्धिक धाटण्या मात्र अलग-अलग असतात. त्यातल्या प्रत्येकाला नेतृत्वाची दीक्षा देण्यात आलेली असते, आणि प्रत्येकाला निरंकुश सत्ता हवी असते. एकट्याची सत्ता. ही महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याआड कोणी आले तर त्याचा काटा मार्गातून दूर करण्यात त्यांना कसलीही दिक्कत वाटत नाही, अशी कल्पना 'गांधारीचे पुत्र' या कथेत डॉ. बाळ फोंडके मांडतात.

आई असूनही गांधारी आपल्या या पुत्रांच्या एकमेकांना संपवण्याच्या स्पर्धेला विरोध करू शकत नाही. एका मुलाने दुसऱ्या अमक्याची हत्या केली की बातमी ती अविचल वृत्तीने ऐकते. फक्त विचारते, ''कोणाची हत्या झाली?'' ''मॅडम, देवगिरीच्याची.'' ''कोणी केली?'' ''कलिंगवाल्यानं.'' ''हं'' म्हणून ती फोन खाली ठेवते. या खुनांचं उदात्तीकरण करण्यात तिला मतलब वाटत नाही. आपले हातही तिला रक्ताने बरबटलेले वाटतात. कारण आपणच पेरलेल्या बीजाची ही फळे आहेत हे तिला माहीत असते. इडनच्या बागेतील सफरचंद इव्ह आणि ॲडम यांनी खाल्लं आणि माणसा-माणसाचा निष्पापपणा संपला. आपण देवराजचा राजकीय स्वार्थ आणि डॉक्टर भरुचांचा व्यावसायिक स्वार्थ यामुळे क्लोनिंगसाठी संमती दिली आणि त्यातून संपूर्ण देशावर अभद्र काळी छाया पसरणारी ही पिलावळ जन्मली. आज ती एकमेकांच्या गळ्याचा घोट घेण्यात गुंतली आहे. ''मॅडम, मिलिटन्सी वाढतेय. दहशतवाद फोफावतोय. अंधाधुंद दहशतवाद्यांच्या बेछूट गोळीबारात आपल्यालाही धोका आहे; म्हणून आपल्या एका मुलाच्या अनेक प्रतिकृती करण्याच्या योगतेला आपण संमती दिली; आणि त्यातून हा अनर्थ उद्भवला.'' आधुनिक गांधारीच्या मनातली ही सर्व खळबळ डॉ. बाळ फोंडके सद्य:कालीन संदर्भात अधिकच अर्थपूर्ण असल्याचे दाखवून देतात. गांधारीप्रमाणे आपल्यालाही आपल्या शंभर पुत्रांची हत्या मृत्यूपूर्वी बघावी लागणार की काय असा प्रश्न तिला पडतो.

**सारेच सज्जन, टक्कर, वसुली**

प्रयोगशाळेत अनेक महत्त्वाचे शोध लागतात. त्या शोधांची कागदपत्रे हस्तगत करून, मूळ संशोधकाची हत्या करून, स्वत:चे श्रेय लाटण्याची वृत्तीही सध्या वाढत आहे. 'सारेच सज्जन' या कथेत अशा उपटसुंभ मिरचंदानीची आपली भेट होते. तो राजीवच्या मृत्यूनंतर सिंगला म्हणतो, ''राजीवच्या वह्या तुम्हाला इथं सापडणार नाहीत. त्या इथं ठेवण्याएवढा राजीव मूर्ख नव्हता. तुम्हाला त्या वह्यांची किती निकडीची गरज आहे हे मला माहीत आहे. म्हणून मी आलोय. माझ्याशी कोलॅबोरेशन केलं तर—'' तो सरळ-सरळ ऑफर देतो. आपला फायदा कसा होईल. यासाठी होतो. दुसऱ्यावर कुरघोडी करताना दिसतो. पण तो फक्त डल्ला मारण्यासाठी.

तंत्रज्ञानाधिष्ठित नवीन यंत्रणांची खरेदी करावीच लागते, परंतु अशा प्रत्येक व्यवहारात भ्रष्टाचार झाल्याचीही बोंब होत असते. 'टक्कर' या कथेतील अशा यंत्रणेची खरेदी करणाऱ्या अविनाशवरही ठपका ठेवला जातो. ग्लोबल व स्कायवेज या दोन कंपन्यांच्या विमानांची टक्कर होता होता वाचलेली असते. स्कायवेजच्या वैमानिकाने सूचनांचे पालन नीट केले नाही हे समजून घेण्याला कोणीच तयार नसते. पण त्याचे खापर अविनाशवर फुटते व त्याला तंबी दिली जाते. **सॅटेलाइटवरच्या ट्रॅन्सपाँडर्सची कोट्यवधी डॉलर्सची यंत्रणा खपवण्याची एक युक्ती म्हणून ही टक्कर जाणून-बुजून घडवण्यात आल्याचा उलगडा नंतर होतो; आणि कोट्यवधीच्या काँट्रॅक्टसाठी एक-दोन लोकांचा जीव गेला तर त्याबद्दल कोणाला पर्वा आहे अशी भावना जी दिसते, ती पाहून अविनाशला हादराच बसतो.** मग चौकशी समित्या वगैरे सगळ्या गोष्टी या केवळ फार्स म्हणूनच उरतात.



अगदी क्लीन असलेल्या माणसालाही आपल्या कह्यात आणण्यासाठी कुठल्या तरी प्रकरणात गुंतवून ब्लॅकमेल केले जाते. 'वसुली'मधील निर्भीड व निर्दोष डॉक्टर संघवींना खोटा रिपोर्ट देण्यास भाग पाडण्यात येते. ''आजवर राजबाबूंनी आपल्याला पाठिंबा दिला, ती केवळ गुंतवणूक होती. त्यावरच्या व्याजाची, परताण्याची वसुली ते आता करीत आहेत.'' याची जाणीव झाल्यावर संघवींना घाम फुटतो. आजवर जपलेल्या वैज्ञानिक प्रतिष्ठेला जात असलेला तडा निमूटपणे बघावा लागतो, म्हणून त्यांना दु:ख होते.

नवीन तंत्रज्ञान वापरून लेदर क्लॉथ वा चर्म वस्त्र निर्माण करण्यात येते; त्याला जनविज्ञान पर्यावरण समिती विरोध करते; रेखा लाटकार आमरण उपोषणाला आरंभ करते. प्रदूषणाबद्दलचे सर्व आरोप डॉ. सुब्रमण्यम पत्रकार परिषदेत खोडून काढतात. या शोधाबद्दल आंतरराष्ट्रीय पेटंट मिळाल्याची घोषणा ते करतात; आणि रेखाचा चेहरा काळाठिक्कर पडतो. रेखावरच पर्यावरणाचे बूमरँग उलटतो– असा 'बूमरँग'चा गाभा आहे. आज सर्वच क्षेत्रात राजकारण शिरले आहे. त्यामुळे एकमेकांना शह काटशह देण्यासाठी जो तो आपल्या प्याद्यांचा वापर करत असतो. विविध संस्थांची उदात्त ध्येये फक्त नावातच असतात, प्रत्यक्षात त्यांचा उपयोग कोणी भलतेच लोक करीत असतात.

**अग्निपरीक्षा**

अग्निपरीक्षा ही या संग्रहातील पहिलीच कथा दीर्घ आहे, आणि महत्त्वाचीही आहे. विद्यापीठातील संशोधन, औषध निर्मितीचे प्रयोग, औद्योगिक क्षेत्रातील भले-बुरे व्यवहार, संशोधकीय हेरगिरी वगैरे बाबी जागतिकीकरणाच्या संदर्भात आता प्रत्येक टप्प्यावर प्रभाव गाजवू लागल्या आहेत, याची व्याप्ती लक्षात आणून देणारी अग्निपरीक्षा ही कथा मल्टि-डायमेन्शनल म्हणता येईल अशी आहे. डॉ. अभ्यंकरांकडे मलेरियावरील आयुर्वेदिक औषधाचे संशोधन अंतिम टप्प्यात आहे. परदेशी रिजवे कंपनीही मलेरियावरच नवे औषध बाजारात आणण्याला उत्सुक आहे. परंतु तिच्या चाचण्यांना किमान वर्षभर तरी लागणार. भारतीय औषध सहा महिन्यात बाजारात येऊ शकते. ते बाजारात आले तर आपल्या औषधाला उठाव मिळणार नाही अशी भीती रिजवे कंपनीला वाटते. अभ्यंकर, त्यांचे संशोधन, त्यांचे विद्यार्थी, त्यांची क्षमता यांची पूर्ण माहिती या कंपनीकडे आहे. डॉ. अभ्यंकरांच्या या औषधाचे कागदपत्र चोरून हस्तगत करण्यासाठी त्यांच्या एका पीएच.डीत 'रखडलेल्या' विद्यार्थिनीचा, बेला बिष्टचा वापर केवलरामाणी चलाखीने करून घेतो. अभ्यंकरांबद्दल तक्रारीचे पत्र बेलाकडून घेऊन कुलगुरूंकडे पाठवले जाते. वृत्तपत्रेही त्याबद्दल भडक बातम्या देतात. संशोधनाचे रेकॉर्डच नाहीसे झाल्याने डॉ. अभ्यंकर अधिकच अडचणीत येतात. परंतु शेवटी पाश्चात्य कंपनीचे हे डावपेच संबंधितांच्या लक्षात येतात आणि डॉ. अभ्यंकरांच्या शोधाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू स्वत:चीच पाठ थोपटून घेतात. आंतरराष्ट्रीय पातळीवर नव्या औषधांच्या वा इतर उत्पादनांच्या बाबत चाललेली स्पर्धा किती गळेकापू होत चालली आहे आणि संशोधन संस्थांतील संधिसाधू व लबाड माणसांचा वावर त्या स्पर्धेला कसे खतपाणी घालत असते याचे 'अग्निपरीक्षे'त विदारक दर्शन

घडते. अशा वातावरणातही कोका कोला सारख्या जागतिक कंपन्या आपल्या कोकच्या अर्काचे गुपित कसे वर्षानुवर्षे सांभाळू शकतात हेही एक आश्चर्यांच! प्रतिस्पर्ध्यांचे संशोधन आपल्याला मिळावे म्हणून औद्योगिक गुप्तहेर यंत्रणाही कशी चलाखीने डावपेच आखत असते याची झलक ही कथा दाखवते.

**कालकूट**

'कालकूट' या कथेत कालप्रवाहाची कल्पना कशी विकृत ठरू शकते हे दाखवले आहे. पार्थसारथी या ५० वर्षे वयाच्या नेत्यावर खुनी हल्ला करून त्याला ठार मारायचे आहे. पण तसे करण्याऐवजी कालप्रवास करून पन्नास वर्षांपूर्वीच्या काळात जायचे आणि पार्थसारथी तान्हुला असतानाच त्याचं अपहरण करून त्याला जंगलात सोडून द्यायचे; तो आपोआपच हिंस्र श्वापदांच्या भक्ष्यस्थानी पडेल आणि इकडे सभा चालू असताना पार्थसारथी भरसभेत खाली कोसळलेला लोकांना दिसेल. आपल्यावर त्याच्या हत्येचा ठपका कोणीच ठेवू शकणार नाही. अशी योजना आखण्यात येते. मात्र या कालप्रवासासाठी शास्त्रज्ञ विजय शेखर याला कसे तयार करायचे हा प्रश्न पक्षाच्या अध्यक्षांना पडतो. पण ते त्या शास्त्रज्ञाच्या अहंकारी वृत्तीचा फायदा घेऊन, त्याला या कामासाठी राजी करतात. अरविंद भूतकाळाच्या प्रवासावर जाऊन कामगिरी फत्ते करून परत येतो. परंतु पार्थसारथीला काहीही होत नाही. तेव्हा पार्थसारथीचा एक जुळा भाऊ आधीच पळवला गेलाय असे लक्षात येते; आणि पक्षाध्यक्ष हा प्रश्न राजकीय पातळीवरच सोडवायला हवा म्हणून स्वत:च आग्रह धरतात.

शेक्सपिअरच्या नाटकातील शायलॉकच्या 'पाउंड फॉर फ्लेश' या कल्पनेवर आधारलेली 'पाउंड ऑफ फ्लेश' ही आधुनिक कथा. डॉ. फोंडके या कथेद्वारे सध्याच्या जीनोमच्या पेटंटमधील संघर्षावर बोट ठेवतात. देशात यावर्षी गव्हातांदळाचे बंपर क्रॉप आलेय, त्यासाठी पिकाच्या जीनोममध्ये आमचा पेटंट असलेला जीन आहे, म्हणून त्याची रॉयल्टी मिळायला हवी असा दावा रिमोट सेन्सिंग एजन्सीचे लोक करतात. हा दावा उलटवताना जो युक्तिवाद आपले मंत्रीमहोदय करतात, तो अफलातून आहे. 'जीनोममधला जीन तुम्ही काढून घ्या पण त्याच्या इतर गुणधर्मांना धक्का लागला तर होणारे नुकसान तुम्हाला भरून द्यावे लागेल... शॉयलॉकने काय मागितले होते ते तुम्हाला ठाऊक हवेच...' एक भन्नाट कल्पना या कथेत दिसते.

अमेरिकन विद्यापीठातील एकूण कारभारात भारतीय संशोधकांची अनेक प्रकारे गळचेपी केली जाते. या गळचेपीचे एक प्रकरण ब्रेन ड्रेन या पत्ररूप कथेत वाचकांसमोर येते. कमी पगारावर व खालच्या हुद्द्यावर काम करायला नकार देणाऱ्या श्रीधर करमरकरला पीएच्. डी. ची पदवीही नाकारण्यात येते; आणि त्याला भारतात परतावे लागते. भारतात त्याचे संशोधन त्याच्या नावावर प्रसिद्ध होते आणि त्याच्या देशप्रेमाचेही मग कौतुक होऊ लागते.

विज्ञानविश्वातील नव्या संकल्पना आणि संशोधन क्षेत्रातील राजकारण, शास्त्रज्ञांचे अहंकार , कौटुंबिक नात्यांचे नवे ताणेबाणे या सर्वांना या कथांमध्ये स्थान मिळालेले आहे. त्यामुळे डॉ. फोंडके म्हणतात त्याप्रमाणे या कथांमध्ये वास्तवताही शिगोशिग भरून राहिलेली आहे. रंजनाबरोबर आजच्या व उद्याच्या वास्तवाचेही भान या कथांना आहे.

**किंमत : १५०रु. सवलतीत : १२०रु.**
**सभासदांना : ११३रु. पोस्टेज :२०रु.**



| हे पुस्तक का वाचावे? | |
|---|---|
| | १)भारतभर गाजलेल्या सुपरकॉप किरण बेदी यांच्या जीवनाचे व यशाचे रहस्य काय? |
| | २)त्यांच्या जगण्याची सूत्रे कोणती? |
| | ३)तिहार जेलचा कायापालट त्यांनी कसा केला? |
| | ४)विपश्यनेमुळे त्यांना झालेले फायदे. |
| | ५)शारीरिक फिटनेसबरोबर मानसिक फिटनेसही हवा. |
| | ६)आपलेही जीवन कदाचित या पुस्तकामुळे बदलून जाईल. |

# मजल दरमजल

**डॉ. किरण बेदी**

**अनु.भारती पांडे**




***प्रत्येक क्षण आनंदाने जगण्याचा आणि दुसऱ्याला आनंद देण्याचा निर्धार***

किरण बेदी यांच्या 'आय डेअर' आणि 'इट्स ऑलवेज पॉसिबल' या पुस्तकांना मराठी वाचकांची भरघोस दाद मिळाली. एक तडफदार पोलिस अधिकारी या नात्याने त्यांनी केलेल्या कार्याचे वेगळेपण आणि मोठेपण सर्वांनाच स्तिमित करणारे वाटते. तिहार जेलचा त्यांनी तीन वर्षात कायापालट घडवून आणला आणि कैदी म्हणून तुरुंगात खितपत पडलेल्या गुन्हेगारातील माणूसपणाचा शोध घेत, त्यांनी त्यांचा आत्मसन्मान जागा केला. त्यांना विपश्यना वगैरे मार्गाने आत्मचिंतनास, समाजोपयोगी कार्य करण्यास व आपल्यातील चांगुलपणाची बूज राखण्यास

प्रेरणादायक वातावरण निर्माण केले. **''आपल्या वैयक्तिक क्षमतांचा सुयोग्य विकास करून त्यांना कलात्मक सृजनशील स्वरूप देऊ शकणाऱ्या व्यक्तीच समाजाला दिशा दाखवू शकतात** हे वास्तव स्वीकारून, किरण बेदी यांनी प्रत्येक कामाकडे नव्या नजरेने बघून, अपारंपरिक अशा मार्गांचा अवलंब करून हाती घेतलेल्या कामांमध्ये हेवा वाटण्याजोगे यश मिळवले. त्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावले. अनेक अडीअडचणींना असीम धैर्याने तोंड दिले.

'मजल दरमजल' हे त्यांचे नवे मराठी पुस्तक छोटेच असले तरी त्यांनी विविध क्षेत्रात केलेल्या कार्याचे व्यापक दर्शन घडवणारे आणि त्या कार्यामागची वैचारिक बैठक स्पष्ट करणारे आहे.

मोर्चा दर मोर्चा या सरोज वशिष्ट संपादित हिंदी पुस्तकाचे भारती पांडे यांनी केलेले हे मराठी भाषांतर आहे.

तिहार जेल– माझे दुसरे घर, विपश्यनेची शक्ती, नशामुक्ती कार्यक्रम, पोलिस यंत्रणेतील सुधारणांची दिशा, माध्यमांची जबाबदारी, कुटुंब- स्त्री-शक्ती- युवाशक्ती यांचे महत्त्व, वगैरे विषयांवरील किरण बेदी यांचे अनुभवसिद्ध चिंतन या पुस्तकात आले आहे. त्याचबरोबर मी आणि माझे जीवन, जगण्याची काही सूत्रे या लेखांमधून त्यांची जीवनसूत्रेही प्रकट होतात.

'मी आणि माझे जीवन' या छोटेखानी लेखात किरण बेदी यांनी आपल्या दिनक्रमाची व पूर्वायुष्यातील काही साक्षात्कारी क्षणांची कल्पना दिली आहे.

सकाळी सहाला एक कप चहा पिऊन तासभर फिरायला जायचे; परतल्यावर एक कप दूध व फलाहार, दुपारचे जेवण हलके. रात्री एक पोळी, डाळ, भाजी, फळे. संध्याकाळच्या पार्ट्या त्यांना आवडत नाहीत. अधेमधे काही खाणे त्या टाळतात. शारीरिक फिटनेसबरोबर मानसिक फिटनेसबाबतही त्या दक्ष असतात. संगीताची आवड आहे. वाचन-लेखनही चालू असते. नव्या लोकांना भेटायला आवडते. रिकामपण टाळणे. निरोगी राहण्यासाठी शांत स्वभावाचीही उपयुक्तता मोठी असते असे त्या मानतात. आपल्या आवडीचा एक तरी खेळ असावा व तो नियमित खेळावा. खेळामुळे व्यक्तिमत्त्व सर्वांगीण विकसित होते. ''आज मी जी काही आहे त्यामागे टेनिस कोर्ट आहे.''

मुलगा की मुलगी हा सवालच कधी त्यांना पडला नाही. मुलांना न जमणाऱ्या गोष्टीही सहजपणे करायची प्रवृत्ती अंगात बाणली गेली. निर्भयपणा आला. विचारांत मोकळेपणा आला. कॉलेजातही लहानसहान प्रसंगांतून त्यांची विद्रोहाची मानसिकता घडत गेली.

नोटीस बोर्ड वाचताना उंच मुले-मुली पुढे उभ्या. किरण बेदी उंचीने कमी. त्यांनी मुलांना म्हटले, ''अरे, तुम्ही दुसऱ्यांना नोटीस बोर्ड बघू देणार की नाही?''

वाहने उभी करण्याच्या जागी काही मुले मुलींची छेड काढत. किरण बेदींनी प्राध्यापकांना म्हटले, ''मुलींच्या वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंग करा.''

डॉ. राधाकृष्णन यांची उपनिषदांवरची पुस्तके त्यांनी वाचली. मार्गरिट थॅचरचे पाथ टू पॉवर, राजमोहन गांधीचे द गुड बोटमन– वगैरे पुस्तकांनी झपाटले. वेळेचे नियोजन, आत्मविकास, आध्यात्मिक अनुभव, सकारात्मक जीवनदृष्टी याबद्दलची पुस्तके वाचण्यात त्यांना रस वाटू लागला. कविता-लेखनाचीही उर्मी प्रबळ असे.



टेनिसच्या आवडीमुळे ओळख झालेल्या ब्रिजशी लग्न. ब्रिजचे वास्तव्य व्यवसायामुळे अमृतसरला असते. दांपत्यजीवनाबद्दल किरण बेदींना समाधान आहे. सासूचे प्रेम आहे. **''आपले दैव आपल्या मुठीत आहे आणि जे काही घडेल ते आपल्या कर्माचा परिणाम म्हणून घडेल''** अशी त्यांची श्रद्धा आहे.

''मी एक प्रशिक्षित कार्यकर्ती आहे. अभ्यास, धावणे, खेळणे– आपले प्रत्येक पाऊल विशिष्ट ध्येयाच्या दिशेने पडते आहे. नजर शिखरावर खिळलेली आहे. पेचप्रसंगांनीच जीवनाला गती येते असे त्या मानतात.''

आपल्या जीवनाची सूत्रे म्हणून किरण बेदी काही गोष्टींना महत्त्व देतात. वेळेचा सदुपयोग. मानसिक आंतरिक बळावरचा विश्वास. आत्मसन्मानाची जाणीव, सतत क्रियाशील राहण्याची वृत्ती, ज्ञानप्राप्तीची लालसा, प्रत्येक क्षण आनंदाने जगण्याचा व दुसऱ्याला आनंद देण्याचा निर्धार, विपश्यना, साधना, योग, चिंतन, प्रार्थना, मन, शरीर, व्यवसाय, मैत्री, प्रकृती या सर्वांत काही आंतरिक सुसंगती हवी. तर मग आनंदाचा खरा अनुभव येतो. सृजनात्मक जीवनशैली ही आपल्या अस्तित्वाला, जगण्याला खरा अर्थ देते अशी त्यांची श्रद्धा आहे.

तुम्ही जीवनाला कंटाळलेले आहात? मरगळलेले आहात?

हे पुस्तक तुम्हाला जगण्याचा नवा मार्ग दाखवील. तुमचे जीवन बदलून टाकू शकेल. शारीरिक फिटनेस आणि मानसिक फिटनेस - दोन्हींची मूलसूत्रे तुमच्या लक्षात आणून देईल.

**किंमत : ८० रु. सवलतीत : ६८ रु.**

**सभासदांना : ६० रु. पोस्टेज : २० रु.**

# नवी स्पर्धा

खाली काही लेखकांची नावे दिली आहेत. त्यातच यापूर्वी होवून गेलेल्या साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद भूषविलेल्या लेखकांची नावेही दडलेली आहेत. साहित्य संमेलनांच्या अध्यक्षांची नावे ओळखा व बक्षीस मिळवा.

*वि. स. वाळिंबे, व. पु. काळे, प्र. के. अत्रे, रणजित देसाई, राम शेवाळकर, बाबा कदम, महेश एलकुंचवार, वसंत बापट, वि. स. खांडेकर, अनिल अवचट, पु. ल. देशपांडे, गं. बा. सरदार, मालती बेडेकर, द. भि. कुलकर्णी, विश्वास पाटील, वि. दा. सावरकर, शि. म. परांजपे, शंकररार खरात, आशा बगे, रा. श्री. जोग, नारायण सुर्वे, दुर्गा भागवत, राजन खान, गंगाधर गाडगीळ, राजन गवस द. वा. पोतदार, संजिवनी मराठे, प्रमोद जोगळेकर, सुमेध वडावाला*

बरोबर उत्तर पाठवणाऱ्यांपैकी लॉट टाकून येणाऱ्या पहिल्या तीन स्पर्धकांना आपल्या पसंतीची प्रत्येकी १०० रुपयांचे पुस्तक बक्षीस.


**मुदत १५ फेब्रुवारी २००२ पर्यंत**

आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथ जगत,** १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०.

# अमृत धारा

## संपा. निर्मलकुमार फडकुले
## द. ता. भोसले

***आठशे वर्षातील ३२ मराठी संतकवींचे निवडक वेचे***




डॉ. निर्मलकुमार फडकुले आणि डॉ. द. ता. भोसले या दोघांनी मिळून विविधधर्मीय संत-कवींच्या काव्यातील काही प्रेरणादायक वेच्यांची निवड करून 'अमृतधारा' हे पुस्तक तयार केले आहे. महानुभाव महदंबा ही मराठीतील आद्य कवयित्री (शके ११५० ते १२२५). श्रीकृष्ण-रुक्मिणी यांच्या काल्पनिक विवाह प्रसंगी गाण्यासाठी तिने वरप्रशस्तीचे धवळे रचले. तिच्या लेखणीतून उतरलेली कृष्ण-रुक्मिणीची प्रथम भेट, वरमाला घालण्याआधी रुक्मिणी तिच्या मनात उठलेले भावकल्लोळ महदंबेने चित्रमय शैलीत आविष्कृत केले आहेत.

*रुक्मिणीते पाहावेया तीन्ही लोकु आले :*
*भीमकी देखोनि क्षेत्री वीकळ गेले :*
*हरिएली चैतन्ये एका हातौनि गळती हातियारू :*
*अस्तवीति ब्रह्मादिक जवळ पातले वसुदेव कुमरू :*
*हंसगती झडती चाले ते बाळा :*
*आनंदे आसुवें काही न देखे नेत्र विशाळा :*
*कंपित चाचरिती रोमांच आंगी स्वेद लल्हाटी*
*तव तिया रुक्मिणि यादवरावो श्रीकृष्ण देखिला थाटी :*

हे आठ-नऊशे वर्षांपूर्वीचे मराठीचे आद्यस्वरूप आहे; त्यातील चाचरित, थाटी (थाटाने), झडती चाले (झपाट्याने), हातियारू (हत्यार), पाहावेया, गळती यासारखे शब्द आजही वापरात आहेत हे विशेष.

वारकरी परंपरेतील नामदेव, ज्ञानेश्वर, सावता माळी, गोरा कुंभार, चोखामेळा, जनाबाई, मुक्ताई, नरहरी सोनार, सेना न्हावी, कान्होपात्रा, एकनाथ, तुकाराम यांचे गाजलेले अभंग या पुस्तकात निवडले गेले आहेत. उदा.

झाडलोट करी जनी- केर भरी चक्रपाणी (जनाबाई),
नाही देह शुद्ध याति अमंगळ अवघे वोंगळ गुणदोष (चोखामेळा),



आम्ही वारिक वारिक करू हजामत बारीक (सेना न्हावी)
देवा तुझा मी सोनारा तुझे नामाचा व्यवहार (नरहरी सोनार),
कांदा, मुळा भाजी अवघी विठाबाई माझी (सावता माळी) इ.

चोखामेळा याची बहीण निर्मळा हिचा 'रात्र-दिवस मन करी तळमळ बहु हळहळ वाटे जीवा' हा आर्त उद्गार आजही तितकाच आवाहक वाटतो.

फादर थॉमस स्टिफन्सच्या (१५४९-१६१९) क्रिस्तपुराणातील 'जैसी हरळांमाजी रत्ना किळा। की रत्नामाजी हिरा निळा। तैसी भासांमाजी चोखळा भासा मराठी।।' ही मराठी भाषेच्या पाश्चात्य प्रशस्तीची आद्य ओवी होय.

शेख महंमद हा जनार्दन स्वामींचा गुरुबंधू. कबीराचा अवतार म्हणून मराठी संतपरंपरेत स्थान. ''शांति विवेक भट सद्गुरू। शेख महंमद केले स्थिरू' म्हणणारा हा कवी अमंगळ उपासना, जन्मश्रेष्ठत्वाची व कर्मठ ब्राह्मण्याची संकल्पना यांच्याबद्दलची नाराजी प्रकट करतो. सोवळ्या-ओवळ्याचे स्तोम निरर्थक आहे, ज्ञानाच्या आंघोळीने, प्रेमबोधाच्या प्रयागाने अष्टांगे शुद्ध होतात, शांती-विवेक हे सद्गुरू मनाला स्थिर करतात असे मत तो प्रकट करतो.

समर्थ रामदासांच्या प्रभावळीतील वेणाबाई (१६२७-१६७८) हिचे सीता स्वयंवर काव्य प्रसिद्ध आहे. रामनामाने ती धन्यता अनुभवते.

*धन्य होणे सफळ जिणे रामगुणें होतें*
*ध्यास पडे ज्यास त्यास सत्य कळो येतें*
*सर्व सोडी राम जोडी भजनीं नि:काम*
*धन्य तुम्ही धन्य आम्ही गाउं रामनाम।।*

नासिकचे मध्वमुनीश्वर इ. स. १७३१ मध्ये सेंदूरवाडा येथे समाधिस्थ झाले. रागदारीचे ज्ञान असल्याने त्यांच्या पदरचनेत माधुर्य व गेयता ओतप्रोत भरलेली आहे.

*सोडी कर झडकरी सखया*
*मज भरू दे नीर।*
*वंशवटात किं चेटक केलें भारूनि यमुनातीर*
*नेटकी देखूनी ललना तिचें ओढिसी चीर।।*

वीरशैव संप्रदायाचे अध्वर्यू मन्मथस्वामी (१५६०-१६१३), यांनी हाती डफ घेऊन फड गाजवले. कराडच्या देवीची लावणी ही मराठीतील पहिली लावणी मानली जाते. त्यांचे प्रमुख शिष्य लिंगेश्वर, त्यांचे शिष्य बसवलिंग शिवदास रचनांचा समावेश अमृतधारेत केला गेला आहे.

गोमंतकातील आद्यकवी सोहिरोबानाथ (१७१४-१७९२), यांच्या ''साजणी वो बाई धुंडू लाग धुंडू लाग। तुझिया अवगुणा लागुनि दुरावे कान्हा, कोठे आहे गे हरि सांग'' मधील आतुर उतावीळ आजच्या अस्वस्थ मातेची मन:स्थितीही काही वेगळी नसते याची खात्री पटवते.

जालना जिल्ह्यातील परतूरचे कवी लक्ष्मण रऊळगावकर (१८-८-१८७८) यांचे ४००० अभंग उपलब्ध आहेत. सिद्धेश्वर माहात्म्य हा त्यांचा ग्रंथ. 'कडू पेरले भोपळे कैसी येतील द्राक्ष फळे। लक्ष्मण म्हणे बा रे पेरिले ते उगवे रे।।' असा त्यांचा इशारा आहे.

संतकवी जिनसागर (१७२४-१७४४) यांचे वास्तव्य विदर्भातील कारंजा येथे होते. आदित्यव्रतकथा, अनंतव्रत कथा, पद्मावती कथा वगैरे विपुल लेखन त्यांच्या नावावर आहे. त्यांचा उतारा ज्ञानेश्वरीचे स्मरण देणारा आहे.

*''कीं चंद्रामृताचा आल्हाद। चातकाचे जाणे स्वाद*
*तेथे कावळे प्रमोद काय पावती।।*
*तैसी हे जिनकथा अभव्यासी न रुचे सर्वथा*
*त्यासी कधी हे प्रसन्नता। नव्हे स्वस्वरी।।*

राष्ट्रसंत तुकडोजी (१९०१-१९६८) यांची ग्रामगीता म्हणजे ग्रामीण भागाचे आमूलाग्र परिवर्तन करण्याचा प्रभावशाली मंत्रच होय. ''हिंदभूच्या भाविकांनो, आत्मबल मिळवा अता। भ्याड-वृत्ति सोडुनि हृदयी धरा बुद्धिमत्ता।'' असे आवाहन करीत ते 'जगासि सुखी उन्नत करावे हेच त्या जगन्नियंत्याला रुचते' याकडे लक्ष वेधतात.

आठशे वर्षातील बत्तीस मराठी संतकवींचे हे निवडक वेचे एकत्र वाचायला मिळण्याची सोय 'अमृतधारा' द्वारे संपादकांनी साधली आहे.

**किंमत : ८० रु. सवलतीत : ६८ रु.**

**सभासदांना : ६० रु. पोस्टेज : २० रु.**

## स्पर्धा निकाल

### ऑक्टोबर २००१ निकाल

१) शतजन्मीचे नाते प्रथम सासूशी जोडता आलं तर...
**पुस्तकाचे नाव : शोध सुखाचा, लेखिका : संजीवनी वाडेकर**
२) यांच्या मनात पाप आलं तर ?
**पुस्तकाचे नाव : नॉट विदाऊट माय डॉटर, लेखिका : बेट्टी महमुदी अनु.:लीना सोहोनी**
३) कोणत्या पाशवी शक्ती इथे काम करत होत्या?
**पुस्तकाचे नाव : देव? छे! परग्रहावरील अंतराळवीर, लेखक : बाळ भागवत**
४) उंचीवरच्या माणसाची हीच शोकांतिका.
**पुस्तकाचे नाव : माझं माझ्यापाशी?, लेखक : व. पु. काळे**
५) एक सूर्यफूल असतं.
**पुस्तकाचे नाव : कांचनगंगा, लेखिका : माधवी देसाई**
६) इतर बायका-पुरुष तिची टिंगल करत होते.
**पुस्तकाचे नाव : तीन दगडाची चूल, लेखिका : विमल मोरे**

**यशस्वी स्पर्धक**
१) **राहुल गजानन भोसले**, मु.पो. कोलाड, ता. रोहा, जि. रायगड - ४०२३०४.
२) **जागृती विद्यालय, पाचोरा**, संभाजीनगर, ता. पाचोरा,जि. जळगाव - ४२४२०१.
३)**अनिल ज्ञानदेव मानकर,**वार्ड नं. ३,राजनगर, नांदुरा, जि. बुलढाणा-४४३४०४.

**यशस्वी स्पर्धकांचे अभिनंदन!**
आपण आपल्या पसंतीची १००रुपयांची पुस्तके कळवावीत.
आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथ जगत,** १२१६, सदाशिव पेठ, पुणे-३०




**हे पुस्तक का वाचावे?**

१) 'गबाळं' या गाजलेल्या दलित आत्मकथनाच्या लेखकाची नवी कलाकृती.
२) शहरातील झोपडपट्टीच्या स्थलांतराचे मर्मभेदक चित्रण
३) गुन्हेगारी व व्यसने यांच्या सरसहा प्रभावाखाली वावरणारे तरुण व त्यांची मानसिकता यांचे वास्तव दर्शन
४) दारिद्र्य, अपघात, फसवणूक - यातूनही टिकून राहणारी माणुसकी

# अंधाराचे वारसदार

**दादासाहेब मोरे**




***झोपडपट्टीतील कुटुंबावर कायम घोटाळणारे अस्थिरतेचे कृष्णमेघ***

अंधाराचे वारसदार ही झोपडपट्टीच्या जीवनाची एक विदारक झलक दाखवणारी कादंबरी. 'गबाळ' मध्ये कुडमुड्या जोशी जमातीचे चित्रण करणाऱ्या दादासाहेब मोरे यांनी आता त्या जमातीबाहेरच्या जगाकडे, शहरातील झोपडपट्ट्यांमधील स्थलांतरितांच्या जीवनसंघर्षाकडे आपले लक्ष वळविले आहे.

कॉलेजमध्ये नव्यानेच जाणारा तरुण रमेश सिनेमाची तिकिटं ब्लॅकनं विकणाऱ्या एका टोळीत नकळत ओढला जातो आणि पहिल्याच झटक्यात पोलिसांच्या तावडीत सापडतो.

गणपा हातभट्टीवाला व त्याचे साथीदार त्याला जामिनावर सोडवतात खरा, पण दारू, मटका, गर्द, वेश्या, पान सिगारेट– या सर्वांची चटक त्याला लागते; आणि ब्लॅकमध्ये तिकिटे विकून या व्यसनांची नशा पूर्ण करण्याची त्याची धडपड चालू राहते. पैसे मिळतात पण ते कधीच पुरे पडत नाहीत. नेहमीच कडकी चालू राहते. उधार उसनवार करावी लागते. तशात शहरातील झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन स्थलांतर करण्याची योजना कार्यान्वित होते. आठ-दहा झोपडपट्ट्यातील हजार-बाराशे कुटुंबांना शहरापासून दोन-तीन किलोमीटर अंतरावरच्या काळ्या रानात हलवण्यात येते. प्रत्येकी पंधरा बाय दहा फुटांची जागा, अशा चाळीस-पन्नास घरांची रांग, दोन रांगांमध्ये कच्चा मुरुम टाकून केलेले रस्ते– नगरपालिकेनं तयार केलेल्या यादीनुसार जागांचे वाटप होत राहते.

घरे कधी बांधून होणार याचे वेळापत्रक कोणालाच ठाऊक नसते. तात्पुरती सोय म्हणून प्रत्येक कुटुंबाला थोडे कळक दिले होते. त्या बांबूच्या कळकांनी खोपटं किंवा झोपडी उभी करून तात्पुरता निवारा ज्याचा त्यानं उभा करायचा होता. त्याप्रमाणं लोक कुठून-कुठून पालापाचोळा, पत्रे, प्लॅस्टिक शीट वगैरे आणून आपला उघड्यावरचा संसार झाकण्याचा प्रयत्न करत होते. उघड्यावरच चुल धडधडत होत्या. खाणं-पिणं चालू होतं. बायाबापड्या चार-सहा घरात धुणं-भांडी करून संसाराला हातभार लावत. शाळा लांब. त्यामुळं मुलं आळस करत.

झोपडपट्टीतल्या लोकांचे नाना उद्योग. कोणी माकडवाले होते, कोणी चिंध्या कागद गोळा करणारे. कोणी गवंड्याच्या हाताखाली बिगारी काम करीत. कोणी आडत दुकानात हमाली करत. पोपटवाले जोशी पोपटाचा पिंजरा घेऊन भविष्य सांगत. कोणी भाकरीचे शिळे तुकडे वाळवून बिस्किटाच्या कारखान्यात, पाव-ब्रेडच्या बेकरीत देत.

दादासाहेब मोरे या झोपडपट्टीतील वेगवेगळ्या माणसांचे व समस्यांचे वैविध्य दाखवू पाहतात. त्यासाठी रमेशच्या कुटुंबाप्रमाणेच सुनीलच्या कुटुंबालाही मध्यवर्ती स्थान देतात. स्थानांतरामुळे अनेकांच्या रोजी-रोटीतही व्यत्यय येतो. सुनीलचा बाप रामाप्पा व आई सावित्रीबाई चौथ्या मजल्यावरच्या स्लॅबचं सिमेंट ओतण्याच्या कामाला जातात. शिडीवरून पाट्या वर पोचवताना रामाप्पा खाली पडतो. लोखंडी सळ्यांवर पडल्याने, त्याच्या मांडीत सळ्या घुसतात. रक्त वाहू लागते. त्याला ठेकेदार हॉस्पिटलमध्ये घेऊन जातो. सावित्रीबाईही त्याच्या मागोमाग जाते. डॉक्टर उजवा पाय मांडीपासून कापतात. ते म्हणतात, ''महिनाभर हालचाल करायची नाही. कुबड्या लावून चालायची सवय करावी लागेल. दर आठवड्याला तपासणीसाठी या.'' मुलगा सुनील शाळा चुकवू लागतो. आईलाही कामावर जाणे कठीण होते. इमारतीचा मालक औषध-पाण्यासाठी थोडे पैसे देतो.

झोपडपट्टीवाल्यांच्या घरबांधणीच्या कामाकडे कोणीच लक्ष देत नाही. तेव्हा मोर्चा काढण्याचे ठरते. सुदाम, नऱ्या, रमेश व इतर तरुण मोर्चाची तयारी करतात. ''तुम्ही मोर्चात आला तरच तुम्हाला घर मिळेल. निवेदनावर सही नाहीतर आंगठा करा.'' त्या निवेदनाच्या प्रती कलेक्टर, पोलिस स्टेशन, वृत्तपत्रे यांना देण्यात येतात. कापडी बॅनर्स तयार करण्यात येतात. मोर्चापुढे सुदामचे भाषण होते. निवेदन नगराध्यक्षांना देण्यात येते.

रमेशचा दोस्त नऱ्या एकदा रमेशच्या बहिणीला– शेवंतीला एकटीच गाठतो. ''तुझ्या भावाचा दोस्त तर आहेच. मग तुझा दोस्त झालो तर काम बिघडलं? ... '' शेवंता त्याच्या अंगावर तांब्या भिरकावते. डोकं धरून तो झोपडीबाहेर पळतो. लोक झोपडीपुढे जमतात. पण गुंड नऱ्याशी वैर घ्यायला कोणीच तयार नसते. पण तेवढ्यात रमेश चाकू घेऊन नऱ्याचा



बदला घ्यायला येतो. गणपाला बघून मात्र तो पाय मागे घेतो.

नगरपालिकेच्या निवडणुकांची धांदल सुरू होते. तशात या झोपडपट्टीला आग लागते. अग्निशामक दलाच्या गाड्या येईपर्यंत बहुतेक झोपड्या जळून खाक होतात. पुढारी झोपडपट्टीला भेट देतात. आश्वासने देतात. गुंड नऱ्या इतर टोळीवाल्यांना सांगतो, ''आपण मदतीसाठी फेऱ्या काढू. धान्य, पैसा इ. काही हाती लागले तर बघू. नाहीतर झोपडीही गेली आणि संधीही गेली असं होईल. आपल्यातली परस्परांची दुश्मनी या प्रसंगापुरती विसरून कामाला लागलं तरच! ज्याच्या ज्याच्या गँगच्या हाताला जे लागेल ते त्याचं.''

मग हे तरुण गटागटानं शहराच्या वेगवेगळ्या भागात फिरून पैसे– मदत गोळा करतात. लोकही कमी-जास्त मदत करतात. धान्य, कपडे, भांडी, ब्रेड, पैसे– निवडणुकीतले उमेदवारही साड्या, चादरी वाटतात. मताला शंभर रुपये भाव देतात. प्रत्येक टोळी प्रमुखाला उमेदवार गणपा दहा-दहा हजार रुपये देतो. मते न आणली तर मात्र जिवंत ठेवणार नाही असा दमही भरतो. गणपा दारूवाला निवडून येतो.

ब्लॅकने तिकिटे विकताना रमेशची आणि अरुणची मारामारी होते. नऱ्याही रमेशला मारतो. रमेश कसाबसा पळत घरी येतो. आई त्याला हळद मलमपट्टी करते. रमेश रात्री नऱ्याला रस्त्यात गाठून त्याच्यावर चाकूचे वार करतो. त्याच्याबरोबरचे सुनील व अकबर पळ काढतात. पोलिसांच्या हाती सापडू नये म्हणून रमेशही पळ काढतो. आपण पोलिसांच्या हाती सापडलो तर अंधारकोठडीत डांबले जाणार; नाहीतर झोपडपट्टीत लपून राहून अंधाराचे वारसदार म्हणून दिवस काढणार. आपल्या जीवनाला लागलेले हे भेसूर भयानक वळण; त्यातून आपली सुटका नाही. या विचाराने तो त्या भेसूर अंधारात रस्ता दिसेल तिकडे धावत सुटतो... त्याची सगळी स्वप्ने उद्ध्वस्त झालेली असतात.


झोपडपट्टीत राहण्याची पाळी आलेल्या तरुणांना जी संगत मिळते ती त्यांना गुन्हेगारीकडे आणि व्यसनांकडे नेते आणि शेवटी त्यांना अंधाराचे वारसदार बनवते.

दादासाहेब मोरे यांनी या झोपडपट्टीतील गरीब रहिवाशांच्या आयुष्यातील परवड वेगवेगळ्या संदर्भासह वाचकांपर्यंत पोचवण्याचा प्रयत्न केला आहे. रमेश हा नायक म्हणून प्रामुख्याने त्यांनी रंगवला आहे. नऱ्या हा खलनायक. सुनील व इतर गँगवाले, रमेश व सुनील यांची कुटुंबे व त्या झोपडपट्टीतील एकमेव धनिक गणपा दारूवाला– या मोजक्या पात्रांनिशी झोपडपट्टीतील लोकांच्या सुख-दु:खाची एक झलक या कादंबरीत मोरे यांनी दाखवली आहे. तटस्थपणे झोपडपट्टीवासीयांच्या ससेहोलपलटीचे भिन्न-विभिन्न प्रकार मोरे पेश करतात; गुन्हेगारी जगाचाही फेरफटका घडवून आणतात. क्रौर्याला सामोरे जाताना मोरे हे काहीसे दचकत दबकतच पुढे जातात. फार खोलात जाण्याचे टाळतात. झोपडपट्टीबद्दल लिहितानाही त्यांना आपण अप्रिय कर्तव्य करत आहो असे काहीतरी जाणवत असावे. त्यात तसा त्वेष नाही. चीड नाही. असहाय अगतिकता आहे. साक्षीभावाने सगळे अध:पतन बघताना या जीवनाचा भेसूर भयानक शेवट होणार ही खंत त्यांना सर्वाधिक सतावते. ''उद्याच्या भेसूर जीवनाची कल्पना कोणीतरी आपल्याला वेळीच द्यायला हवी होती'' अशी पश्चात्तापाची भावना रमेशमध्ये शेवटी जागी होते. पण आता ती निरुपयोगी असते. सरळ रेषेत जायचे कितीही मनात असो, अंधारात वाट वाकडी-तिकडी होण्याची शक्यता अंधाराच्या वारसदारांबाबत विशेषच राहते– असा इशारा ही कादंबरी देते.

**किंमत : १०० रु. सवलतीत : ८५ रु.**

**सभासदांना : ७५ रु. पोस्टेज : २० रु.**

# फुले आणि काटे



## दलित-ग्रामीण साहित्याची चळवळ मंदावली आहे का?

साहित्यविश्वातील नवचळवळींमागील प्रेरणा साहित्यलक्ष्यी असल्या तरी त्यामागील विचारांची वा तत्त्वसरणीची मांडणी अनेकदा साहित्यबाह्य क्षेत्रांतील तत्त्वचिंतकांनी केलेली दिसते. शैवसंप्रदाय, बौद्ध धर्म, जैन धर्म, नाथसंप्रदाय, भक्तिसंप्रदाय, महात्मा फुल्यांचे भेदक समाजचिंतन, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय समाज, संस्कृती आणि धर्मजीवन यांचे मूलगामी कठोर विश्लेषण– परीक्षण, मार्क्सचा साम्यवाद तसेच महात्मा गांधींचा सर्वोदयवाद यांनी स्वकालीन साहित्यविश्वात नवे प्रवाह प्रवर्तित केले. कालान्तराने हे प्रवाह साहित्याच्या इतिहासाचे स्थितिगतिदर्शक कालखंडरूप पावले. ह्या तत्त्वज्ञांनी घडविलेल्या नवजीवनदर्शनाने प्रेरित होऊन त्या त्या काळी नवी साहित्यचळवळही अस्तित्वात आली. तिने मूळ साहित्यविश्वाला अर्थपूर्णता व गतिमानता देऊन नवजागरण साधले. कालान्तराने अशा चळवळी क्षीण होत गेल्या तरी त्यांचे योगदान साहित्याची कक्षा विस्तृत करण्यात, साहित्याचा स्तर उंचावण्यात आणि काल सापेक्षी नवजाणिवांनी साहित्य समृद्ध करण्यात सार्थकी लागले.

**ग्रामीण साहित्य चळवळ**

मराठी ग्रामीण साहित्य चळवळीला महात्मा फुले आणि राजर्षी शाहू यांच्या क्रांतिकारी विचारांचा समृद्ध वारसा लाभला. ग्रामीण वास्तव जीवनातील समस्या, सुखदु:खे, वैशिष्ट्यपूर्ण पेच, वृत्तिप्रवृत्तींची वळणे, शोषणरूपे इत्यादींची चित्रणे आघाडीच्या ग्रामीण साहित्यिकांच्या कथाकादंबऱ्यांतून विपुलतेने आढळतात. मराठवाड्यातील प्राचार्य रा. रं. बोराडे, चंद्रकांत भालेराव, भास्कर चंदनशिव, मुकुंद कृष्ण गायकवाड, त्र्यंबक असरडोहकर, सोपान हाळमकर, वासुदेव मुलाटे, गणेश आवटे, श्रीराम गुंदेकर आदींनी मराठवाड्याच्या ग्रामीण जीवनवास्तवाची साक्षेपी चित्रणे केल्याने ग्रामीण साहित्यविश्वात मराठवाड्याचे एक पृथगात्म दालन सिद्ध झाले.

तथापि कोणत्याही साहित्यचळवळीमागील वैचारिक भूमिका वेळोवेळी तपासण्याची आवश्यकता असते. त्यासाठी कठोर आत्मपरीक्षणाची आणि अटळ परिवर्तनास सामोरे जाण्याची क्षमताही असावी लागते. कालसापेक्षतेने, मूळ तत्त्वधारा न सोडता, आपल्या विचारांची आणि त्यानुसार साहित्यविषयक प्रेरणा, प्रयोजन, आशयद्रव्ये, मूल्यसरणी या संबंधीची सखोल विचारान्ती पुनर्मांडणी करण्याची साक्षेपी भूमिका स्वीकारावीच लागते. एकूणच मराठी साहित्यविश्वातील



नवप्रवाहांच्या संदर्भात नेमके हेच घडताना दिसत नाही. म्हणून अशा नवसाहित्य चळवळींच्या उगमस्थानी असणाऱ्या तत्त्वधारेचा आवेग ओसरताच चळवळी क्षीण होताना दिसतात. दलित साहित्य चळवळीला परिपूर्ण तत्त्वसरणी देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखे, सर्वस्पर्शी, क्रांतिकारी आणि जागतिक पातळीवरील घडामोडींचे भान असणारे नेतृत्व लाभले खरे. पण कालान्तराने साहित्यचळवळीचे नेतृत्व करणारे लेखक आपल्या आत्मसंतुष्ट वृत्तीने आणि वैचारिक मतभेदांच्या भोवऱ्यात सापडल्याने चळवळ मंदावत गेली.

दुसरीकडे ग्रामीण साहित्यचळवळीला लाभलेली महात्मा फुल्यांची तत्त्वधारा उत्स्फूर्त, आवेगी आणि कालसापेक्षतेकडे झुकणारी असल्याने कालान्तराने ती अपुरी ठरणे अटळ होते. परिणामी दलित साहित्य चळवळीच्या रेट्याने ग्रामीण साहित्याची चळवळ काही काळ पुढे जात राहिली आणि अखेर थांबली.

एकीकडे दलित साहित्यातील विद्रोही भूमिका ग्रामीण साहित्य लेखकांना खुणावत होती, दुसरीकडे ग्रामीण जीवनवास्तवातील वृत्तिप्रवृत्तींच्या विसंगतीवर आधारलेल्या विरोधनाट्याच्या आश्रयाने कथानुभवांची मांडणी करून लोकरंजनपर कथाकथन करण्याचाही तिला हौस होती. शिवाय ग्रामीण जीवनवास्तव पुरेशा समर्थपणे व्यक्त होण्यापूर्वीच ग्रामीण चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या लेखकांना कलात्मकतेची अनिवार ओढ वाटू लागली होती. विद्रोही भूमिका घ्यावी तर हा विद्रोह ज्याच्या विरोधात, तो चेहरा मात्र स्पष्ट होत नव्हता. आपल्याला प्रांजळपणे अनुसरणाऱ्या नवोदित तरुण लेखकांचे भविष्य अंधारात लोटून ह्या चळवळीचे नेतृत्व आज थंडावले आहे. सुदैवाने ग्रामीण साहित्य चळवळ ही प्राधान्याने कृषिजीवनातील शोषितांची चळवळ आहे याचे नव्याने भान देणाऱ्या काही अनुकूल घटना घडत आहेत. आज उदारीकरणाच्या वा जागतिकीकरणाच्या संदर्भात शेतकऱ्यांच्या जीवन-मरणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. प्रस्थापित ग्रामीण चळवळीला ह्या जागतिकीकरणाच्या संदर्भात एखादी तात्त्विक भूमिका घेता येईल का, तसेच जागतिक संदर्भ असलेली कृषिचळवळ व ग्रामीण साहित्य चळवळ यांची सैद्धान्तिक पुनर्मांडणी करता येईल का, या दृष्टीने सखोल चिंतन होणे लाभदायक ठरेल.

दलित आणि ग्रामीण साहित्याच्या चळवळी आज थांबल्या आहेत, याचा अर्थ त्या संपल्या आहेत, असा नव्हे. ज्या सामाजिक जीवनावस्थांतूनत त्या जन्मल्या तशा जीवनावस्था कालान्तराने पुनरावृत्त होताच त्या पहिल्यापेक्षाही अधिक प्रबळपणे प्रकट झाल्याशिवाय राहणार नाहीत. विशेषत: आज थंडावलेले दलित साहित्य ज्वालामुखीच्या सुप्त शिखरासारखे आहे. या दृष्टीने विद्रोही साहित्य चळवळीतील नवलेखकांनी अंतर्मुख होऊन स्वत:च्या साहित्यनिर्मितीमागील प्रेरणा– प्रयोजन, आविष्कार पद्धती, आदींचे सखोल चिंतन करणे उचित ठरेल. त्यांनी दलित साहित्य चळवळीला नवे व्यापक परिमाण दिले पाहिजे. पूर्वसूरींचे केवळ अनुकरण न करता नव्या दिशा धुंडाळून चळवळीचे उत्तरदायित्व समर्थपणे पेलले पाहिजे. अखेर समग्र जीवनाच्या अभिसरणाला गतीही दिली पाहिजे. असे काही घडले तरच दलित आणि ग्रामीण साहित्यचळवळी परंपरा निर्माण करू शकतील. अशा शाश्वत साहित्य परंपरा असणे हे ह्या जगतात फक्त भारतासारख्या प्राचीन संस्कृतिसमृद्ध राष्ट्रातच घडू शकले आणि घडू शकते. आज दलित साहित्यिकांना आणि त्यांना प्रेरक ठरणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाही महात्मा गौतम बुद्ध आणि त्यांनी प्रवर्तित केलेला बौद्ध धर्मच शोषितांच्या विद्रोही तत्त्वज्ञानाच्या सिद्धतेला उपयोगी

पडला याचा विसर पडू नये.

(डॉ. सुहासिनी इर्लेकर, मराठवाडा साहित्यसंमेलन अध्यक्षीय भाषणातून)

## सांस्कृतिक तुच्छतावादाचा त्याग करण्याची गरज.

आपल्या महाराष्ट्रात गेल्या वीस-पंचवीस वर्षांत साहित्य संमेलनांना (मग ती ग्रामीण साहित्य संमेलने असली तरीही) बहुजनवर्गाची उपस्थिती मोठ्या संख्येने आढळते. हा आपल्याकडील लक्षणीय बदल आहे. या समारंभांना मोठ्या संख्येने उपस्थित राहणाऱ्या आमच्या श्रोत्यांची, 'गर्दीची संमेलने' म्हणून हेटाळणी करण्यात येते तेव्हा आश्चर्य वाटते.

आता आपण सर्वांनीच किंबहुना विविध विचारांच्या आधारवडाखाली उभ्या राहिलेल्या नव्या-जुन्या साहित्य-संस्थांनी, सांस्कृतिक संस्थांनीही, मी तर थोडे पुढे जाऊन असेही सुचवू इच्छितो की सर्व सामाजिक संस्थांनी, आपण कोठून कोठे आलो, कोठवर प्रवास केला, वाटेत कसकशी आवश्यक तेव्हा विकासासाठी किंवा आत्मबलासाठी स्थिरावलो व पुन्हा प्रवास करून आता कोठे आहोत ते चिकित्सक दृष्टीने लोकमंगलासाठी अंतर्मुख होऊन स्वत:ला तपासले पाहिजे. आपल्यातील प्राथमिक उत्साही किंवा अनुभवांचे शहाणपण सतत न उगाळता, नित्य नवे प्रसंग, संघर्ष व मागच्यापेक्षा भीषण किंवा उत्साह वाढवणारे अनुभव ध्यानात घेऊन गंभीरपणे चळवळीचा शोध व त्यातून बोधही घेतला पाहिजे.

मुख्यत: अ. भा. मराठी साहित्य महामंडळाने वरील सर्व प्रवाहांना स्वत:शी कसे एकत्र जोडता येईल, प्रादेशिक अस्मिता बाजूस ठेवून, सर्व दुराग्रह, गैरसमज टाळून, मराठी भाषा आणि साहित्य व संस्कृतीचा विकास कसा साधता येईल, हे पाहिले पाहिजे. विशेषत: सामाजिक गृहितातून, विषम समाजरचनेच्या दुर्दैवी, जुनाट, वाढत्या आणि अधिकच तीव्र झालेल्या चुकीच्या समजातून आलेल्या कालबाह्य गोष्टींना नाकारून जर आपण स्वच्छ मनाने उभे राहिलो तर ते वातावरण मराठी प्रदेशातील कोणत्याही थरातील रसिकांना अथवा लेखक-कलावंतांनासुद्धा उपकारकच ठरेल.

गेल्या पंचवीस-तीस वर्षांत पुढे आलेल्या सर्व तऱ्हेच्या प्रवाहांतील नव्या रचनाकारांमध्ये कमालीचे शैथिल्य आलेले आहे. पुन्हा पुन्हा तोच तोच मजकूर थोड्या वेगळ्या प्रकारे मांडत राहत आहेत. आपल्या अवतीभवती कितीतरी विलक्षण घटना घडताहेत व सर्वसामान्य माणसे त्यात गुरफटून अस्तित्वच हरवल्यासारखी कशीबशी वागताहेत, जगताहेत. दिशाहीनपणा, अनास्था, सार्वजनिक सौजन्य, नीतिमत्ता आणि भ्रातृभाव किंवा एकूण मनुष्यताच नाहीशी झाली आहे, अशा तऱ्हेने वागताहेत. वडीलधाऱ्या लेखकांकडे, कलावंतांकडे उदार मनाने, संवेदनशील व स्वीकारशील वृत्तीने आदर बाळगून वागले पाहिजे. खोटा सांस्कृतिक तुच्छतावाद आणि किडकी, रोगट मनोवृत्ती उपयोगाची नाही. समतोल विचार, बंधू लेखकांविषयीचा आदर, ऋणाईत वृत्ती आणि त्या पिढ्यांकडूनही काही शिकण्यासारखे होते. तत्कालीन श्रोते अथवा रसिकांनी त्यांनाही मिरवले होते हे लक्षात ठेवायला हवे. तुच्छतेने कोणीही मोठा झालेला नाही हे सत्य आहेच.

**तसेच अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या निवडीविषयी सांगावेसे वाटते. दरवर्षी हा वार्षिकोत्सव होत असतो. किंबहुना तो लोकोत्सवच असतो. तीन दिवस साजरा होणारा हा लाखो रसिकांच्या, श्रोत्यांच्या उत्साहाचा शब्दोत्सव ही घटना भारतीय सभासंमेलनांच्या इतिहासातही अपूर्व अशीच आहे. त्यात रसिक आणि शासन आपापला आर्थिक वाटा उचलीत असतातच. तरीही अद्यापही अध्यक्षीय निवडीची मतदानाने केली जाणारी पद्धत टाळता आली तर बरे होईल. ही निवड लोकशाही पद्धतीनेच होते त्यातही शंका नाही. तरीही तो सन्मानपूर्वक म्हणजे ती निवडणूक वगैरे न करता 'निवड' पद्धतीने केल्यास तिला येणारे लढतीचे स्वरूप, अटीतटीचा वितंडवाद, चुरस किंवा कटुता टळेल. भारतीय ज्ञानपीठासह बहुतेक सन्माननीय पुरस्कार निवड समितीद्वारा निवड करूनच दिले जातात. त्यामुळे त्या त्या लेखकाचा आदरही वाढतो व साहित्याचाही गौरव होतो. नव्या विविध सामाजिक स्तरांतून गेली अनेक वर्षे प्रस्थापित झालेल्या साहित्य व सांस्कृतिक संस्थांच्या मान्यवरांचा सल्ला घेतल्यास तोही संयुक्तिक ठरेल.**

(नारायण सुर्वे, कोकण मराठी साहित्य परिषद, ७वे अधिवेशन-- अध्यक्षीय भाषणातून)

## यापुढे ज्ञान हेच प्रमुख भांडवल.

बदलत जाणारी जागतिक अर्थव्यवस्था, वेगाने बदलत जाणारे तंत्रज्ञान आणि भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप आणि ढाचा यात होत जाणारे मूलभूत स्वरूपाचे बदल लक्षात घेतले तर नवीन अभ्यासक्रम मराठी भाषेत शिकलेल्या तरुण-तरुणींना रोजगारसंधी किती प्रमाणात उपलब्ध होऊ शकतील, याचा विचार करण्याची गरज आहे. रोजगार मिळवून देण्याची क्षमता असलेले नवे अभ्यासक्रम सुरू करून मराठी भाषेत शिकलेल्या युवा पिढीसाठी रोजगाराची शक्यता निर्माण करणे आपल्याला साध्य व्हायला हवे.

मराठी भाषेच्या विकासाच्या दृष्टीने आणखी एक महत्त्वाचे साधन म्हणजे इंग्रजीसकट इतर सर्व भाषांतील वेगवेगळ्या विषयांवरील लिखाण सातत्याने मराठीमध्ये अनुवादित करण्याचा प्रयत्न करणे, विशेषत: शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या पातळीवर तर याचे महत्त्व फारच आहे. अगदी दूरची गोष्ट सोडा, परंतु साहित्य, समाजशास्त्रे व इतर नैसर्गिक शास्त्रांमधील लिखाण व संशोधनासाठी सुप्रसिद्ध असलेली अनेक नियतकालिके आज आहेत. अगदी फ्रेंच, जर्मन, रशियन इत्यादी भाषांतील लिखाण मराठीत अनुवादित करण्याचा प्रश्न थोडा बाजूला ठेवला, तरी इंग्रजी भाषेतील असे लिखाण मराठीत अनुवादित करणे सहज शक्य आहे. समाजशास्त्रांतील लिखाणासाठी सुप्रसिद्ध असलेल्या Economic and Political Weekly या नियतकालिकातील गेल्या सुमारे साडेतीन दशकातील अत्यंत गाजलेले असे लेख मराठीत अनुवादित केले तरीही आज आपल्याकडे शिकवल्या जाणाऱ्या अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास इत्यादी विषयांसाठी दर्जेदार माहिती व ज्ञान उपलब्ध होऊ शकेल. यासंबंधात मला चिनी राज्यकर्त्यांचे अभिनंदन करावेसे वाटते. जगातील एके काळी प्रगत अशा ग्रीक आणि लॅटिन भाषांतील मूलभूत लिखाण गेली एक हजार वर्षे सातत्याने चिनी भाषेत अनुवादित करण्यात आले. समाजशास्त्रे तसेच गणित, पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र इत्यादी मूलभूत वैज्ञानिक शास्त्रातील माहिती आणि ज्ञान आज चिनी भाषेत उपलब्ध आहे चिनी भाषेत करण्यात आलेल्या वरील विषयांवरील लिखाणाचे अनुवाद झाल्यासच हे शक्य होऊ शकेल.

आधुनिक जगात भांडवलाची संकल्पना बदलत गेली असून, ज्ञान हेच आज एक प्रमुख

भांडवल झाले आहे. त्यामुळे इंग्रजी आत्मसात करण्याचा अभिजन वर्गाचा प्रयत्न स्वाभाविक म्हणावा लागेल. परंतु हा अभिजन वर्ग संपूर्णपणे पाश्चिमात्य संस्कृतीच्या आहारी जाताना दिसत आहे आणि ते सुद्धा पाश्चिमात्य संस्कृतीचा जो मूल्यात्मक भाग आहे, त्याच्या नव्हे; तर वरवर दिसणाऱ्या देखाव्याच्या. या सर्व गोष्टी अनिवार्य आहेत असे नाही तर त्यात लोकांना प्रतिष्ठा दिसते. या ही पुढे जाऊन 'आमच्या मुलांना/नातवंडांना मराठी येत नाही' असे म्हणण्यातही काही जणांना धन्यता वाटते. हाच अभिजन वर्ग मराठीच्या भवितव्यासाठी सातत्याने चर्चा करताना दिसतो, तेव्हा त्याच्यातील एकूणच मानसिक विसंगती व्यक्त झाल्याशिवाय राहात नाही.

थोडक्यात मराठीसकट कोणत्याही भाषेच्या विकासाचा विचार करीत असताना त्या प्रश्नाची व्यापकता आणि गुंतागुंत लक्षात घेणे आवश्यक आहे. कोणत्याही एका प्रकारच्या अभिनिवेशाच्या आहारी न जाता एक दीर्घकालीन व्यवहार्य धोरण ठरविणे शक्य होईल.

(कोमसाप– सातवे अधिवेशन– उद्घाटनाच्या भाषणातून– डॉ. भालचंद्र मुणगेकर)

## आमची २००१ सालातील नवीन प्रकाशने

### कादंबरी

| | | |
|---|---|---|
| नवी स्त्री | वि. स. खांडेकर | १००/- |
| कलेचे कातडे | डॉ. आनंद यादव | २००/- |
| ब्लास्फेमी : **तेहमिना दुर्रानी** | अनु. भारती पांडे | १५०/- |
| **(ना.ह.आपटे पुरस्कार २००१-०२)** | | |
| द लास्ट डॉन : मारिओ पुझो | अनु. अनिल काळे | ३५०/- |
| क्रोमोझोम-६: रॉबिन कुक | अनु. वैशाली जोशी | ३५०/- |
| द मिरॅकल : आयर्विंग वॅलेस | अनु. जयवंत चुनेकर | ३००/- |
| डॉ.झिवागो : बोरिस पास्तरनाक | अनु. आशा कर्दळे | २५०/- |
| द सिस्टरहुड : कॉलिन फोर्बस् | अनु. अंजनी नरवणे | २५०/- |
| फिअर इज द की : ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. अशोक पाध्ये | १६०/- |
| द कंपनी ऑफ विमेन | खुशवंत सिंग | २००/- |
| इथे फुलांना मरण जन्मता | द.ता.भोसले | ८०/- |
| अंधाराचे वारसदार | दादासाहेब मोरे | १००/- |
| गटुळं | रवींद्र बागडे | १२०/- |
| कांचनगंगा | माधवी देसाई | १५०/- |
| वडवाई | अंजनी नरवणे | २००/- |

### कथासंग्रह

| | | |
|---|---|---|
| भूमिकन्या | डॉ. आनंद यादव | ९०/- |
| रावीपार **: गुलजार** | अनु.विजय पाडळकर/ मोहन वेल्हाळ | १५०/- |
| फुलांचे बोल **: आन्ना साक्से** | अनु. सुनीती देशपांडे | १००/- |



| | | |
|---|---|---|
| व्हर्च्युअल रिॲलिटी (विज्ञान कथा) | डॉ. बाळ फोंडके | १५०/- |
| रिवणावायली मुंगी | राजन गवस | १३०/- |
| असं म्हणू नकोस | माधवी देसाई | १२०/- |
| किनारा | माधवी देसाई | ९०/- |

### ललित गद्य

| | | |
|---|---|---|
| संचित | रणजित देसाई | ६०/- |
| हसत जगावं | डॉ. रमा मराठे | १००/- |
| सुखशांतीच्या शोधात | अंजली ठकार | १००/- |
| अवती भवती | वसुधा पाटील | १२०/- |
| शोध सुखाचा | संजीवनी वाडेकर | ८०/- |

### चरित्रे- आत्मचरित्रे- आत्मकथन

| | | |
|---|---|---|
| आमार मेयेबेला : (तसलिमा नासरिन) | अनु.मृणालिनी गडकरी | २००/- |
| मजल दरमजल : किरण बेदी | अनु.भारती पांडे | ८०/- |
| टाईमपास : प्रोतिमा बेदी | अनु. सुप्रिया वकील | २५०/- |
| चाकाची खुर्ची | नसीमा हुरजूक | १८०/- |

### राजकीय

| | | |
|---|---|---|
| ख्यातनाम इतिहासकार : अरूण शौरी | अनु. सुधा नरवणे | १५०/- |
| बिग इगोज,स्मॉल मेन : राम जेठमलानी | अनु. माधव मोर्डेकर | ८०/- |
| द अदर साईड ऑफ सायलेन्स : उर्वशी बुटालिया | अनु. नारायण अवटी | २५०/- |

### आरोग्य व इतर

| | | |
|---|---|---|
| रेकी | शुभदा दामले | ६०/- |
| अक्षय सुखाचे वरदान : रेकी | नीलम दोशी | ६०/- |
| कोटीमोलाची प्रश्नोत्तरे | उमा खरे | ७०/- |
| करोडोंचे सामान्य ज्ञान | सुनीता दांडेकर | ८०/- |

### विज्ञानविषयक

| | | |
|---|---|---|
| वेध पर्यावरणाचा | निरंजन घाटे | १५०/- |
| जिज्ञासापूर्ती | निरंजन घाटे | १५०/- |
| विज्ञानाचे शतक | निरंजन घाटे | २००/- |
| विश्वातील सजीवसृष्टी | अनु. डॉ. बाळ फोंडके | ६०/- |

| | | |
|---|---|---|
| नवी पिढी नवे राज्य | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ६०/- |
| नामशेष झालेले प्राणी | डॉ. किशोर पवार | ५०/- |
| सागरातील नवलाई | डॉ. किशोर पवार | ८०/- |

## संतसाहित्य

| | | |
|---|---|---|
| अमृतधारा- (संतकाव्यातील वेचे) | डॉ. निर्मलकुमार फडकुले<br>डॉ. द. ता. भोसले | ७०/- |

## वैचारिक

| | | |
|---|---|---|
| नवी पहाट (ओशो) | अनु. प्रज्ञा ओक | १००/- |
| साक्षात्काराची देणगी (ओशो) | अनु. प्रज्ञा ओक | १२०/- |

## बालवाङ्मय

| | | |
|---|---|---|
| विनोदवीर बिरबल | निर्मला सारडा | २५/- |
| लाजवाब बिरबल | निर्मला सारडा | २५/- |
| बिरबलाच्या रोचक गोष्टी | निर्मला सारडा | २५/- |
| बिरबलाचे चातुर्य | निर्मला सारडा | २५/- |

## संदर्भ ग्रंथ

| | | |
|---|---|---|
| १९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह | डॉ. आनंद यादव | १५०/- |
| स्वामी : एक शोध | संपा. डॉ. मीरा घांडगे | १५०/- |

## नाटके

| | | |
|---|---|---|
| पांगुळगाडा | रणजित देसाई | ६०/- |
| तुझी वाट वेगळी | रणजित देसाई | ६०/- |
| सावली उन्हाची | रणजित देसाई | ५०/- |

## काव्य

| | | |
|---|---|---|
| वारा आणि कमळ | मीरा | ६०/- |

## संकीर्ण

| | | |
|---|---|---|
| कारगिलनामा | अनु.नारायण आवटी | १६०/- |

**(राज्य पुरस्कार २०००-०१)**



# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ **जानेवारी २००२**
◆ **वर्ष दुसरे**
◆ **अंक तिसरा**

*— अनुक्रमणिका —*


| | |
|---|---|
| **संपादकीय -** | २ |
| **साहित्यवार्ता** | ७ |
| **पुरस्कार** | १९ |
| **श्रद्धांजली** | २४ |
| **पुस्तक परिचय** | |
| व्हर्च्युअल रिॲलिटी-डॉ. बाळ फोंडके | २७ |
| मजल दरमजल - अनु. भारती पांडे | ३२ |
| अमृतधारा- निर्मलकुमार फडकुले/द.ता.भोसले | ३५ |
| अंधाराचे वारसदार- दादासाहेब मोरे | ३८ |
| **नवी स्पर्धा** | ३४ |
| **स्पर्धा निकाल** | ३७ |


✠ संपादक :
सुनील मेहता
✠ कार्यकारी संपादक :
शंकर सारडा
✠ संपादन सहाय्य :
सुनीता दांडेकर
✠ अंकाची किंमत १० रु.
✠ वार्षिक वर्गणी ८० रु.
तीन वर्षाची २००रु.
पाच वर्षांची ३००रु.
✠ वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.
✠ प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

✠ मांडणी-अक्षरजुळणी :
***मेहता पब्लिशिंग हाऊस***

✠ संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१२१६ सदाशिव पेठ,धनश्री अपार्टमेंटस्, पुणे-३०.
फॅक्स : ०२०-४४७५४६२
Email - mehpubl@vsnl.com

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*